दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

७० वर्ष — निर्भीड पत्रकारीतेची

शुक्रवार, दि. १९ जून २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १७४ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


# गडचिरोलीतील सहा लोहखनिज खाणी राज्य शासनाला देण्याची मागणी

## केंद्रीय मंत्री जी. किशन रेड्डी यांच्यासोबतच्या बैठकीत मांडली प्रभावी बाजू : स्टील उत्पादन निर्यातदार म्हणून भारताला पुढे आणण्याचे उद्दिष्ट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई (दै. संध्या)**




महाराष्ट्राला देशातील 'ग्रीन स्टील हब' बनविण्याच्या उद्देशाने केंद्रीय कोळसा व खनिकर्म मंत्रालयाने गडचिरोलीतील सहा लोहखनिज खाणी महाराष्ट्र राज्य खनिज महामंडळाला द्याव्यात, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय कोळसा व खनिकर्म मंत्री जी. किशन रेड्डी यांच्याकडे केली. या खाणी राज्य शासनाला मिळाल्यास दोन वर्षात कार्यान्वित करून 2030 पर्यंत उत्पादन सुरू करून पुढील काळात स्टील उत्पादन निर्यातदार म्हणून भारताला पुढे आणू असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

राज्यातील खनिकर्म व ऊर्जा निर्मिती संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा या शासकीय निवासस्थानी केंद्रीय कोळसा व खनिकर्म मंत्री जी. किशन रेड्डी यांच्या समवेत बैठक झाली. यावेळी केंद्रीय खनिकर्म राज्यमंत्री सतीशचंद्र दुबे, राज्याचे खनिकर्म राज्यमंत्री पंकज भोयर, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, केंद्रीय अतिरिक्त सचिव वीणा कुमारी, कोळसा मंत्रालयाच्या अतिरिक्त सचिव भूपिंदर ब्रार, राज्याच्या पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, जलसंपदा विभागाचे सचिव एकनाथ डवले, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिपेंद्रसिंह कुशवाह, जेएनपीएचे अध्यक्ष गौरव दयाळ, उपाध्यक्ष रविश कुमार सिंह यांच्यासह कोल इंडिया, वेस्टर्न कोलफिल्डचे अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, गडचिरोलीमधील लोहखनिज देशातील सर्वाधिक दर्जेदार खनिजांपैकी एक आहे. त्यामुळे गडचिरोली हे भविष्यात देशातील महत्त्वाचे औद्योगिक व पोलाद उत्पादन केंद्र म्हणून विकसित होईल. यातून 3 लाख कोटींची गुंतवणूक येईल आणि लाखो रोजगार निर्माण होतील. गडचिरोलीमध्ये मोठ्याप्रमाणात लोहखनिज साठे असून चुनखडीसह पोलाद उद्योगासाठी आवश्यक इतर खनिजेही उपलब्ध आहेत. याशिवाय जवळपास कोळसा खाणी, मुबलक जलस्रोत आणि आवश्यक पायाभूत सुविधा असल्याने पोलाद उद्योगासाठी हा परिसर अत्यंत अनुकूल आहे. गडचिरोली भागात नक्षलवादाचा प्रभाव कमी झाल्यामुळे विकासासाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे खाण आणि उद्योग उभारणीसाठी ही मोठ्या संधी आहेत. राज्यातील स्टील उद्योगांसाठी टाटा, जेएसडब्ल्यूसह अनेक मोठ्या कंपन्यांनी महाराष्ट्र शासनासोबत सामंजस्य करार केले आहेत. विविध उद्योगांसाठी मोठ्याप्रमाणावर जमीन उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया सुरू आहे. स्टील हब निर्माण करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने या भागात इको-सिस्टीम तयार केली आहे. जेएनपीटी आणि वाढवण बंदरांना गडचिरोलीशी जोडणारे रेल्वे व मालवाहतूक जाळे विकसित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. समृद्धी महामार्गालगत रेल्वेसाठी आवश्यक जागाही राखीव ठेवण्यात आली आहे. या सर्व प्रकल्पांमुळे महाराष्ट्रात देशातील सर्वात मोठे स्टील आणि ग्रीन स्टील उत्पादन केंद्र विकसित होत आहे, असेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, राज्यात 40 हून अधिक खनिज ब्लॉक्स लिलावासाठी तयार असून 34 पैकी 14 ब्लॉक्सच्या प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य खनिज महामंडळाकडे सहा खाणी दिल्यास त्या खाणी पुढील तीन ते चार वर्षांत कार्यान्वित करण्यात येतील. त्यासाठी राज्य शासनाने विशेष यंत्रणा उभारली आहे. जिल्हास्तरावर खाण प्राधिकरण स्थापन करण्यात आले असून आवश्यक परवानग्या वेळेत मिळाव्यात यासाठी विशेष यंत्रणा उभारण्यात येईल. या खाणींमधून 2030 पर्यंत 50 दशलक्ष टन लोहखनिज उत्पादन करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यामुळे महाराष्ट्रातील स्टील उद्योगांना मोठा आधार मिळेल.

महाराष्ट्रात उभारण्यात येणाऱ्या एकात्मिक पोलाद परिसंस्थेमुळे चीनपेक्षाही कमी उत्पादन खर्चात पोलाद निर्मिती करणे शक्य होईल. अनेक मोठ्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पोलाद उत्पादक कंपन्यांनी गडचिरोली परिसरात गुंतवणुकीत रस दाखविला असून हजारो एकर जमीनही संपादित करण्यात आली आहे. देशभरात सुमारे 500 खाणींचा लिलाव झाला असला तरी त्यापैकी केवळ 50 खाणी कार्यरत आहेत. खाणींच्या लिलाव प्रक्रियेत आकारल्या जाणाऱ्या अत्यंत उच्च प्रीमियममुळे अनेक खाणी व्यवहार्य राहत नाहीत. त्यामुळे राज्य महामंडळामार्फत खाणी चालवल्यास खनिज उत्पादन वेगाने सुरू होऊ शकेल आणि स्टील उद्योगांना पारदर्शक पद्धतीने खनिज उपलब्ध करून देता येईल, असेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या खाणी राज्य महामंडळाला देण्यात आल्यास राज्य सरकार पारदर्शक पद्धतीने खनिजांचे वितरण पोलाद उत्पादकांना करू शकेल. यामुळे खाणी दोन वर्षांत कार्यान्वित करता येतील आणि देशातील पोलाद उत्पादनाला गती मिळेल. ओडिशा राज्य महामंडळाला देण्यात आलेल्या बॉक्साइट खाण क्षेत्राच्या धर्तीवर महाराष्ट्राने मागितलेले सुमारे 1,300 हेक्टर क्षेत्र मंजूर केल्यास राज्यातील औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळेल. यासंदर्भात केंद्रीय मंत्री रेड्डी यांनी सकारात्मकता दाखविली; तसेच राज्यातील वीज निर्मिती कंपन्यांना कोळशाच्या गुणवत्तेबाबत होणारे वाद व आर्थिक नुकसान टाळण्यासाठी स्वयंचलित (ऑटोमेटेड) नमुना तपासणी प्रणाली लागू करण्याचे निर्देश दिले.

# उरलेले तीन खासदारही लवकरच फुटतील, संजय राऊत काँग्रेसचे 'दलाल'

**मुंबई (दै. संध्या)**



■ नरेश मस्केंची टीका

शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि खासदार नरेश म्हस्के यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत ठाकरे गट आणि खासदार संजय राऊत यांच्यावर अत्यंत शेलक्या शब्दांत टीका केली. ठाकरे गटाच्या सहा खासदारांनी त्यांना बजावलेला व्हिप नाकारत संजय राऊत यांचं थोबाड फोडलं आहे, असा घणाघात म्हस्के यांनी केला. उद्धव ठाकरे हे काँग्रेससोबत शय्यासोबत करत असून केवळ काँग्रेस वाढवण्यासाठी प्रयत्न करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. नरेश म्हस्के यांनी संजय राऊत यांच्यावर थेट टीका करताना त्यांना 'काँग्रेसचे दलाल' असं संबोधलं. त्यांचा दिवा आता विझत चालला आहे, म्हणूनच ते सध्या जास्त फडफडत आहेत, असा टोलाही त्यांनी लगावला. खासदार म्हस्के यांनी संजय राऊत यांच्या राजकीय ताकदीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले की, "संजय राऊत यांचा दम फक्त तोंडात आहे, पण ताकद मनगटात असावी लागते. स्वतः एकनाथ शिंदे यांनी सांगितल्यानंतर आमदारांनी मतं दिली, म्हणूनच संजय राऊत हे खासदार होऊ शकले. आता ठाकरे गटाकडे केवळ तीन खासदार शिल्लक राहिले आहेत. ते तरी किती काळ तुमच्या सोबत राहतात, ते आता बघाच." भविष्यात उद्धव ठाकरेंचा पक्ष हा संपूर्णपणे काँग्रेसमध्ये विलिन होणार आहे. याच भीतीमुळे आणि याच कारणामुळे त्यांच्या खासदारांनी ही बंडखोर भूमिका घेतली आहे, असा दावा नरेश मस्के यांनी केला. तसेच संजय राऊत यांनी या खासदारांची उद्धव ठाकरे यांच्याशी कधीही थेट भेट होऊ दिली नाही, असा दावाही त्यांनी केला. ठाकरेंच्या पक्षांतर्गत वादावर बोलताना म्हस्के यांनी विधानपरिषदेचे माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या उमेदवारी अर्जाचा उल्लेख केला. अंबादास दानवे यांच्या फॉर्मवर 10 आमदारसुद्धा सह्या करण्यासाठी तयार नव्हते. भास्कर जाधव हेदेखील त्यासाठी राजी नव्हते, असा दावा म्हस्केंनी केला.

# ठाकरेंचे फुटलेले खासदार शिंदेंच्या मंचावर दिसणार नाहीत

**मुंबई (दै. संध्या)**




शिंदेंचे ऑपरेशन टायगर जरी यशस्वी झालं असलं तरी बंडखोर सहा खासदारांच्या संबंधी एक मोठी माहिती समोर येत आहे. हे सर्व खासदार 19 जून रोजी होणाऱ्या शिवसेनेच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने शिंदेंच्या मंचावर दिसतील अशी चर्चा सुरू होती. मात्र या खासदारांच्या पक्षप्रवेशाचा मुहूर्त आता बदलण्यात आल्याची माहिती आहे. 21 किंवा 22 जून रोजी हे सर्व खासदार महाराष्ट्रात परत येणार असून त्यानंतर त्यांचा पक्षप्रवेश केला जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. ठाकरेंच्या सहा खासदारांनी बंडखोरी करत शिंदेंची साथ देण्याचं निश्चित केलं आहे. या सहा खासदारांनी त्यांचा स्वतंत्र गट तयार करून लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना एक पत्र दिलं आहे. त्या संबंधी अद्याप कोणताही पुरावा किंवा फोटो समोर आला नसला तरी येत्या एक दोन दिवसात संसदेत त्याची घोषणा केली जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्यानंतर खासदारांचा हा गट शिंदेंच्या शिवसेनेत विलीन होणार असल्याची माहिती आहे. येत्या 19 जून रोजी गोरेगावच्या नेस्को सेंटरमध्ये शिवसेनेच्या वर्धापन दिनाचा कार्यक्रम होणार आहे. याच कार्यक्रमात हे बंडखोर खासदार शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची चर्चा सुरू होती. आता मात्र त्यामध्ये बदल झाला आहे. 19 जून रोजीच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमामध्ये, शिंदेंच्या व्यासपीठावर हे खासदार दिसणार नाहीत. त्यामुळे या खासदारांविना हा कार्यक्रम पार पडणार आहे. बंडखोरी केलेल्या या खासदारांचे मतपरिवर्तन होऊ नये यासाठी त्यांना जयपूरच्या हॉटेलमध्ये ठेवण्यात आल्याची माहिती आहे. जयपूरमध्ये सहापैकी चार खासदार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. तर इतर दोन खासदार वेगवेगळ्या ठिकाणी आहेत. या सर्व खासदारांना 21 जून किंवा 22 जून रोजी महाराष्ट्रात परत आणण्यात येणार आहे. तोपर्यंत लोकसभेमध्ये त्यांच्या विलिनीकरणाची घोषणा झाली असेल. त्यामुळे त्यांना कोणतीही तांत्रिक अडचण येणार नाही. शिंदेच्या शिवसेनेकडून ऑपरेशन टायगर सुरू झाल्यानंतर 16 जून रोजी संध्याकाळी 6 वाजता हे बंडखोर खासदार दिल्लीत पोहोचल्याची माहिती आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी एकनाथ शिंदे यांनी या खासदारांची भेट घेतली आणि त्यांच्याशी चर्चा केली.

### ४ खासदार राजस्थानमध्येच!

या सहा खासदारांनी 17 जून रोजी सकाळी 7 वाजता लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट घेतली आणि स्वतंत्र गट स्थापन करत असल्याचं पत्र दिल्याची माहिती आहे. त्यानंतर सहापैकी चार खासदारांना सुरक्षेच्या कारणास्तव जयपूरमधील हॉटेलमध्ये ठेवण्यात आलं तर दोन खासदार इतरत्र गेल्याचं सांगितलं जातंय.

### कोणते खासदार फुटले

1. संजय जाधव (परभणी)
2. संजय देशमुख (यवतमाळ- वाशिम)
3. नागेश पाटील आष्टीकर (हिंगोली)
4. ओमराजे निंबाळकर (धाराशिव)
5. भाऊसाहेब वाकचौरे (शिर्डी)
6. संजय दीना पाटील (ईशान्य मुंबई)

### ठाकरेंसोबत कोणते खासदार?

1. अरविंद सावंत (दक्षिण मुंबई)
2. अनिल देसाई (दक्षिण मध्य)
3. राजाभाऊ वाजे (नाशिक)


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com


### ढिंग-टांग




## "कोणत्याही बैठकीला जाणार नाही", ठाकरे गटातील खळबळ आणखी वाढली

# 'ऑपरेशन टायगर'मध्ये ट्विस्ट! ओमराजेंची माघार की रणनीती?

**मुंबई (दै. संध्या)**



शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील कथित 'ऑपरेशन टायगर'मुळे राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ सुरू असतानाच धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी केलेल्या वक्तव्यामुळे या संपूर्ण प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. ठाकरे गटातील सहा खासदार एकनाथ शिंदे यांच्या संपर्कात असून स्वतंत्र गट स्थापन करण्याच्या हालचाली सुरू असल्याच्या चर्चेदरम्यान, ओमराजे यांनी आपण अद्याप कोणताही राजकीय निर्णय घेतलेला नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे बंडखोर गटातील संख्याबळाबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, ठाकरे गटाने दिल्लीत संसदीय पक्षाची तातडीची बैठक बोलावून सर्व खासदारांना व्हीप जारी केला असतानाही ओमराजे निंबाळकर यांनी कोणत्याही बैठकीला जाणार नसल्याचे सांगितले आहे. त्यामुळे ते नेमके कोणत्या भूमिकेत आहेत, याबाबत राजकीय वर्तुळात तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. ओमराजे निंबाळकर यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, "मी कोणताही राजकीय निर्णय घेतलेला नाही. सध्या माझ्यासाठी आणि माझ्या कुटुंबासाठी पवनराजे निंबाळकर हत्या प्रकरण सर्वात महत्त्वाचे आहे. या प्रकरणाचा निकाल 20 जून रोजी लागणार आहे. निकाल आल्यानंतरच माझी भूमिका स्पष्ट करेन." यावेळी त्यांनी आपण सध्या दिल्लीत नसून पुण्यात असल्याचेही सांगितले. त्यामुळे बंडखोर खासदारांच्या बैठकीत किंवा ठाकरे गटाच्या संसदीय बैठकीत ते सहभागी होणार नसल्याचे स्पष्ट झाले.

दरम्यान, उद्धव ठाकरे यांच्या पक्षाने सर्व नऊ खासदारांना संसदीय पक्षाच्या बैठकीसाठी व्हीप जारी केला आहे. या बैठकीला गैरहजर राहणाऱ्या खासदारांवर पुढे कारवाईचा आधार तयार करण्याचा प्रयत्न असल्याचे मानले जात आहे.

मात्र, ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनीच एक धक्कादायक दावा केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, बंडखोर खासदारांनी स्वतंत्र गटाच्या मान्यतेसाठीचे पत्र लोकसभा अध्यक्षांकडे एक दिवस आधीच सादर केले होते. त्यानंतरच ठाकरे गटाने व्हीप जारी केला. त्यामुळे हा व्हीप कायदेशीरदृष्ट्या कमकुवत ठरू शकतो.

अंधारे यांनी पुण्यात पत्रकार परिषदेत सांगितले की, "बंडखोर खासदारांचे पत्र कालच लोकसभा अध्यक्षांकडे पोहोचले होते. आम्ही आज व्हीप काढला. त्यामुळे आमचा व्हीप अयोग्य ठरल्याची माहिती मिळत आहे."

शिंदे गटाच्या संपर्कात गेलेल्या खासदारांमध्ये संजय जाधव, संजय देशमुख, नागेश पाटील आष्टीकर, भाऊसाहेब वाकचौरे, संजय दिना पाटील आणि ओमराजे निंबाळकर यांची नावे चर्चेत आहेत.

मात्र, ठाकरे गटाचा दावा आहे की लोकसभा अध्यक्षांकडे सादर करण्यात आलेल्या पत्रावर सहा पैकी दोन खासदारांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. काही आश्वासने पूर्ण न झाल्याने दोन खासदारांनी अंतिम क्षणी पाऊल मागे घेतल्याचा दावा पक्षातील सूत्रांनी केला आहे. त्यामुळे कथित बंडखोर गटाकडे खरंच दोन-तृतीयांश संख्याबळ आहे का, यावरही चर्चा सुरू झाली आहे.




# संपादकीय

## हजारो वर्षांची दीर्घ परंपरा, पण...

हजारो वर्षांची दीर्घ परंपरा असलेलं जपानचं राजघराणं. या राजघराण्याचं भविष्य अवलंबून आहे ते वारसदारांवर. वारसदारांचीच वानवा असल्याने ही परंपरा पुढे कशी चालेल, ही चिंता या राजघराण्याला भेडसावत आहे. यावर तोडगा काढण्यासाठी म्हणून जपानच्या संसदेत म्हणजे डाएटमध्ये सुरू असलेल्या २२१ व्या अधिवेशनात एक सुधारणा विधेयक मांडण्यात येत आहे. राजघराण्यात वारसदारांची संख्या कमी असल्याने राजघराण्याला पुरुष वारस दत्तक घेण्याचा प्रस्ताव पुढे आला आहे. त्यासाठी १९४७च्या 'इम्पिरियल हाऊस लॉ'मध्ये सुधारणा करून हा प्रस्ताव मंजूर करून घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. सध्या जपानच्या शाही कुटुंबात १६ सदस्य आहेत आणि नरुहितो हे जपानचे सम्राट आहेत. त्यांच्यानंतर वारस म्हणून त्यांचे धाकटे भाऊ युवराज अकिशिनो, अकिशिनो यांचे ज्येष्ठ पुत्र हिसाहितो आणि नरुहितो यांचे काका नव्वद वर्षांचे हिताची यांचे नाव घेतले जात आहे. यातील हिताची हे वृद्ध आहेत आणि त्यांना अपत्य नाही. त्यामुळे ते सम्राटपदाचे वारसदार होऊ शकत नाहीत. त्यामुळे राजघराण्याकडे सम्राटपदासाठी आता अकिशिनो आणि हिसाहितो हे दोनच वारसदार आहेत. सम्राट नरुहितो यांना मुलगा नाही. प्रिन्सेस आईको ही त्यांची मुलगी, पण जपानच्या राजघराण्याच्या परंपरेनुसार सम्राटपद पुरुष वंशपरंपरेतील पुरुषानांच मिळते. इतकंच नाही तर राजघराण्यातील मुलींनी राजघराण्याच्या बाहेर जाऊन सामान्य व्यक्तीशी विवाह केला, तर त्यांना शाही कुटुंबातून थेट वगळलं जातं.

या अशा नियमांमुळे आता राजघराण्यातील सदस्यांची संख्या घटत आहे. सोबतच राजघराण्यात तरुण पुरुष वारसदारांची संख्याही कमी झाली आहे. हिसाहितो ज्यांच्याकडे जपानचे भावी सम्राट म्हणून पाहिले जात आहे. त्यांचा २००६ मध्ये जन्म झाला, तेव्हा जपानच्या या राजघराण्याचा आनंद गगनात मावला नव्हता. तब्बल ४० वर्षांनंतर या राजघराण्यात मुलाचा जन्म झाला होता. हिसाहितोच्या जन्मामुळे राजघराण्याच्या वारसदाराचा प्रश्न मिटला होता, पण आता नरुहितो यांच्यानंतर हिसाहितो सम्राट होतील, पण त्यांच्यानंतर वारस ठरतील असे पुरुषच राजघराण्यात नाहीत. राजघराण्याची सम्राट परंपरा अबाधित राहण्यासाठी पूर्वीच्या कायद्याच्या चौकटी थोड्या ढिल्ल्या करून त्यात दत्तक वारसाचा समावेश केला, तर वारसदारांचा प्रश्न मिटेल, असं राजघराण्याला वाटत आहे.



राजघराण्याच्या या पेचाबाबत जपानमधील सामान्य जनताही अवगत आहे. पण, जनतेच्या मनात मात्र वेगळंच आहे. या राजघराण्याने पुरुष वारसदारांचा हट्ट सोडायला हवा. राजघराण्यात प्रिन्सेस आइकोसारखी नम्र, मनमिळाऊ, बुद्धिमान व्यक्ती आहे. तिलाच सम्राज्ञीपद दिलं, तर दत्तक वारस शोधावाच लागणार नाही, असं येथील सामान्य जनतेला वाटतं. आइको या त्यांच्या हुशारीमुळे आणि कर्तृत्त्वामुळे सामान्य जनतेत खूप लोकप्रिय आहेत. आइको या प्रिन्सेस असूनही रेडक्रॉस सोसायटीत काम करून जनतेची सेवाही करतात. आइको यांच्या या गुणांमुळे जपानमधील सामान्यजनांना आइको आपल्या वाटतात. राजघराण्यात सम्राटपदाच्या वारसासाठी इतका तोलामोलाचा सदस्य असूनही राजघराण्याने दत्तक वारसाच्या वाट्याला का जावं, असा प्रश्न जपानमधील जनता विचारत आहे.

# गुरु वचन

## ध्यान प्रार्थनेचे सर्वोच्च रूप

प्रार्थना ईश्वराशी एकरुप होण्याची प्रभावी पद्धत आहे. लोक विविध प्रार्थना करतात. काही लोक संसारिक वस्तूंसाठी प्रार्थना करतात. उदाहरणार्थ चांगली नोकरी, नवे घरे किंवा नवी कार. काही लोक आरोग्यासाठी प्रार्थना करतात ज्यामुळे ते किंवा त्यांचे कुटूंब सुदृढ व्हावे. काही लोक वैयक्तिक संबंध वृद्धींगत होण्यासाठी प्रार्थना करतात. पण बहुतांश लोक संसारिक वस्तुंसाठीच प्रार्थना करतात. सामान्यपणे जेव्हा आपण प्रार्थना करतो तेव्हा आपण ईश्वराकडे स्वत:साठी काहीतरी मागतो. आपण नेहमी त्या वस्तूंसाठी प्रार्थना करतो, ज्या आपल्यासाठी फायदेशीर ठरतील. त्यावेळी आपली जीवनाबाबत माहिती मर्यादित असते. अनेकदा आपण अशा गोष्टींसाठी प्रार्थना करु शकतो ज्या आपल्यासाठी फायदेशीर आहेत पण अखेरीस त्या गोष्टी आपल्यासाठी फायदेशीर ठरत नाही. आपण प्रार्थना करुन एखादी वस्तू मिळवू शकतो पण मोठ्या काळानंतर ती आपल्या लायक नसल्याचे दिसते.

म्हणून मी समजतो की, प्रार्थनाची योग्य पद्धत ईश्वराची इच्छा आपल्या जीवनात उतरवणे. म्हणून अनेक धर्मात म्हण आहे की, माझी इच्छा नव्हे तुमची इच्छा पूर्ण होवो. का? कारण ईश्वराला आपल्या जीवनात घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीची माहिती असते. तो जाणतो की, खरंच आपल्यासाठी काय सर्वोत्तम आहे. उदाहरणार्थ आपण विचार करूतो की, १ कोटीची लॉटरी लागली तर खुप बरे होईल.

पण आपण हे लक्षात घेत नाही की, एवढे पैसे मिळाल्यानंतर दोन गोष्टी होऊ शकतात. आपण मोठ-मोठ्या वस्तूंच्या खरेदीत इतके गुरफटतो की आपण ईश्वराला विसरतो किंवा आपल्या सर्व मित्रांना पैशात वाटा हवा असतो. आपण पैसे न देण्यामुळे मैत्री तुटू शकते व आपण एकटे पडू शकतो म्हणून आपल्यासाठी काय चांगले आहे? हे आपण खरंच समजून घेत नाही. आपल्या मर्यादित दृष्टीकोनामुळे आपण ते मागतो जे आपल्या विचारानुसार चांगले आहे पण जर आपण हे ईश्वरावर सोडले की आपल्यासाठी जे सर्वोत्तम असेल ते त्याने द्यावा तेव्हा आपण खरी प्रार्थना करतो.

प्रार्थनेचे सर्वोच्च रूप म्हणजे ईश्वराला जाणणे व ईश्वरात एकरुप होणे. ईश्वरास जाणण्याची प्रार्थना म्हणजे त्या शक्तीचे आवाहन करणे जिने आपली निर्मिती केली. जेव्हा ईश्वरास जाणण्याची इच्छा आपल्या मनात निर्माण होते तेव्हा ती एक अविरत प्रार्थना बनते, जी तोवर थांबत नाही जोवर आपण ईश्वरास प्राप्त करून घेत नाही.

ईश्वर जाणण्याच्या अशाच प्रार्थनेला ध्यान (मेडिटेशन) किंवा योगा म्हटले जाते. ध्यान प्रार्थनेचे सर्वोच्च रुप आहे. प्रार्थनेत आपण ईश्वराला सांगतो की, आपणास काय हवे आहे. ध्यानात आपण ईश्वरास ऐकतो की, त्यास काय हवे आहे.

ध्यान म्हणजे शांत बसणे नाही. या दरम्यान आपले संपूर्ण लक्ष ईश्वरास शोधत असते. आपण जीवनातील सर्व लक्ष्य विसरुन ईश्वराची दया आपल्या कशी प्रवेश करेल? या तयारीने बसतो. ध्यान यांत्रिक काम नाही. तथापि, काही प्रार्थना यांत्रिक असतात. या ईश्वरात लीन होण्यासाठी आपले मन, व आत्म्यात उठणारी तीव्र इच्छा आणि व्याकुळ अवस्था आहे.

# उपदेशकथा

## यशाला 'शॉर्टकट' नाही

आयुष्यात आपल्याला पुढे जायचे असेल, यशस्वी व्हावयाचे असेल तर भरपूर काबाडकष्ट, परिश्रम करण्याची तयारी हवी. यश तसे मिळत नाही. प्रतिभा म्हणजे दुसरं काही नाही. 'नव्याण्णव टक्के घाम नि एक टक्का राम ।' असे म्हणतात. (जिनीयस इज नाइन्टीनाइन परसेंट... पार्स्पिरेशन अॅन्ड वन परसेंट इन्स्पिरेशन) लेखनाची ढोरमेहनत, काबाडकष्ट यांना सीमा नसते. टॉलस्टॉयने 'वॉर अॅन्ड पीस'सारखी जंगी कादंबरी सात वेळा नव्याने लिहिली आणि त्याच्या पत्नीने न कंटाळता सात वेळा तिची 'फ`अर कॉफी' केली! रचना लिहून पुरी झाली की, लेखकाला उमजते – हे असे नाही, असे लिहिले जायला हवे होते. 'रन्वाँ' या प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शकाने म्हटले होते, 'एखादी फिल्म मी पुरी करतो तेव्हा मला कळते ती कशी करायला हवी होती. (व्हेन यू फिनिश मेकिंग ए फिल्म, यू नो देन हाऊ यू शूड हॅव मेड इट)

कथा उपदेश : परिश्रमाला पर्याय नाही.

# पंचांग

| | |
|---|---|
| १९ जून २०२६ | नक्षत्र:ओषा १०:०६:३६ |
| शुक्रवार | योग:हर्षण १४:५२:४८ |
| विक्रम संवत्- २०८२ | करण:बालव १७:००:०६ |
| निज ज्येष्ठ शके | करण:कौलव |
| संवत्- १९४८ | २८:१७:३७+ |
| संवत्सर – पराभवनाम | सूर्य:मिथुन |
| अयन- उत्तरायणारंभ | चन्द्र:सिंह१०:०६:३६ |
| मास- निज ज्येष्ठ | हिजरी सन् – १४४८ |
| ऋतु- सौर ग्रीष्म | मुस्लिम मास – मोहरम |
| शुक्ल पक्ष | तारीख – ३ |
| तिथि:पंचमी १७:००:०६ | |

# दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९८५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 4 | | 1 | | 3 | | | 7 |
| | | | | 8 | 4 | 3 | 9 | |
| | | 1 | 9 | | | | | |
| | | | | 7 | 5 | | | 8 |
| 1 | 7 | 5 | | | | 9 | 4 | 6 |
| 3 | | | 4 | 1 | | | | |
| | | | | | 7 | 6 | | |
| | 8 | 7 | 3 | 6 | | | | |
| 9 | | | 8 | | 1 | | 5 | 3 |

## : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९८४ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 1 | 4 | 5 | 7 | 6 | 2 | 3 | 8 |
| 8 | 5 | 2 | 9 | 4 | 3 | 7 | 1 | 6 |
| 7 | 6 | 3 | 8 | 1 | 2 | 4 | 9 | 5 |
| 5 | 4 | 7 | 6 | 9 | 1 | 8 | 2 | 3 |
| 2 | 9 | 8 | 3 | 5 | 7 | 1 | 6 | 4 |
| 6 | 3 | 1 | 4 | 2 | 8 | 5 | 7 | 9 |
| 4 | 7 | 6 | 1 | 8 | 9 | 3 | 5 | 2 |
| 1 | 8 | 9 | 2 | 3 | 5 | 6 | 4 | 7 |
| 3 | 2 | 5 | 7 | 6 | 4 | 9 | 8 | 1 |

# इतिहासात आजचा दिवस

## आंतरराष्ट्रीय

- १२६९ – फ्रांसचा राजा लुई नवव्याने ज्यू व्यक्तींना जाहीर ठिकाणी पिवळे फडके न घालता आढळल्यास १० लिव्र्चा दंड फर्मावला.
- १३०६ – मेथ्वेनची लढाई.
- १७७० – इमॅन्युएल स्विडेनबर्गने येशू ख्रिस्त पुन्हा जन्मल्याची नांदी केली.
- १८६२ – अमेरिकेने आपल्या प्रांतातील गुलामगिरीची प्रथा बेकायदा जाहीर केली.
- १८६५ – अमेरिकेतील गॅल्व्हेस्टन येथील गुलामांना मुक्ती. हा दिवस येथपासून जूनटीन्थ या नावाने साजरा केला जातो.

## राष्ट्रीय

- २००६ – काळवीट शिकार प्रकरणात अभिनेता सलमान खानसह तब्बू, सोनाली बेंद्रे, नीलम, सैफ अली खान या चार कलावंतांना जोधपूरच्या न्यायालयाने दोषी ठरवून त्यांच्यावरील आरोप निश्चित केले.

## जन्म

- १३०१ – राजकुमार मोरिकुनी, जपानी शोगनचा जन्म.
- १५६६ – जेम्स पहिला, इंग्लंडचा राजाचा जन्म.
- १६२३ – ब्लेस पास्कल, फ्रेंच गणितज्ञ व तत्त्वज्ञानीचा जन्म.
- १७६४ – होजे गेर्व्हासियो आर्तिगास, उरुग्वेचा राष्ट्रपिताचा जन्म.
- १८९६ – वॉलिस सिम्प्सन, इंग्लंडचा राजा एडवर्ड आठव्याची पत्नीचा जन्म.
- १९०३ – वॉली हॅमंड, इंग्लिश क्रिकेटपटूचा जन्म.
- १९२२ – नील्स बोर, डेन्मार्कचा भौतिकशास्त्रज्ञचा जन्म.

## निधन

- १७९४ – हरिपंत 'तात्या' फडके यांचे निधन. ते साडेतन शहाण्यांपैकी पूर्ण शहाणे.
- १८२० – सर जोसेफ बँक्स या निसर्गशास्त्रज्ञाचे निधन.


: SMS :

Ek Hair Transplant Kerney Wali Company Ney Add Banaya Hae: Aap Shaher Say Ayin Ya Pind Say.. Hamein Hamdardi Hay Sirf Aap Ki Tind Say..!!


# हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३७.२ | २६.४ |
| अहमदनगर | ३६.२ | २४.३ |
| अकोला | ४२.२ | ३०.८ |
| अमरावती | ४१.८ | ३२.३ |
| बीड | ४३.८ | ३१.४ |
| भंडारा | ४४.३ | ३१.१ |
| बुलढाणा | ४१.२ | २९.७ |
| चंद्रपूर | ४४.३ | ३१.७ |
| चेन्नई | ४५.१ | ३३.९ |
| नवी दिल्ली | ४२.१ | ३०.८ |
| धुळे | ४०.८ | २८.३ |
| गोंदिया | ४२.७ | ३१.५ |
| जळगाव | ४१.७ | ३०.६ |
| कोल्हापूर | ३५.४ | २३.३ |
| लातूर | ३८.१ | २७.७ |
| मुंबई | ३९.४ | ३४.३ |
| नागपूर | ४२.७ | २९.८ |
| नांदेड | ४१.३ | ३०.५ |
| नंदूरबार | ३७.७ | २७ |
| नाशिक | ३५.९ | २४.३ |
| पुणे | ३४.४ | २३.५ |
| पंढरपूर | ३६.३ | २६.३ |
| सातारा | ३५.९ | २२.१ |
| सांगली | ३७.१ | २४ |
| सोलापूर | ३६.७ | २८.७ |
| वर्धा | ४३.९ | ३१.९ |

# आजचे राशिभविष्य

**मेष :** नवीन कामाचा आरंभ करण्यास व्यावसायिक प्रदर्शने भरविता येतील. थोरामोठयांचे चांगले सहकार्य लाभेल.

**तुळ :** आपल्या वाक्चातुर्याने दुसऱ्यांची मने जिंकून ध्येयपूर्ती कराल. अनावश्यक खर्चाचे प्रमाण वाढेल.

**वृषभ :** पुढे घडणाऱ्या घटनांची आपल्याला चाहूल लागेल. महिलांनी जपजाप्याकडे जास्त लक्ष द्यावे. आर्थिक बाबतीत काळ अनुकूल आहे.

**वृश्चिक :** सामाजिक प्रतिष्ठा उंचावेल. विवाहेच्छूक तरुणांना मनपसंत जोडीदार मिळेल. जनसंपर्कातून चांगला फायदा होईल.

**मिथुन :** स्वकष्टाचा पैसा मिळेल. तसाच खर्चही वाढेल. दूरच्या प्रवासाचे योग येतील. आत्मविश्वास वाढवणाऱ्या घटना घडतील.

**धनु :** जुने मित्र भेटल्याने मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन केले जाईल. पत्नीचा सल्ला महत्त्वाचा ठरेल. एकमताने निर्णय घ्याल.

**कर्क :** एखादी गोष्ट आपण निश्चित करु शकू हा विश्वास वाटेल.आपल्या वाक्चातुर्याच्या जोरावर मोठी मजल माराल. नोकरीत पदोन्नती होईल.

**मकर :** व्यावसायिक वादंग टाळावेत. आपण हाती घेतलेले प्रत्येक काम यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी सहाय्यकांची मदत मोलाची ठरणार आहे.


**सिंह :** एखाद्या संघटनेच्या नेतृत्वाची जबाबदारी स्वीकाराल. उद्योगातून चांगली प्राप्ती होईल. इच्छा, आकांक्षा कृतीत आल्यामुळे समाधान लाभेल.

**कुंभ :** व्यवसायीक उद्योगातील कामानिमित्त कर्ज प्रकरण रखडले असेल तर ते मार्गी लागेल. प्रिय व्यक्तींच्या भेटी होतील. अंध:श्रद्धेला बळी पडू नका.

**कन्या :** कामाची आखणी नियोजनबद्ध केल्यामुळे व्यावसायिक उत्कर्ष साधता येईल. प्रतिष्ठित व्यक्तींचे सहकार्य लाभेल.

**मीन :** अचनाक अनावश्यक खर्च उद्भवतील. मानसिक ताणतणाव जाणविण्याची शक्यता राहते. पूर्वनियोजित प्रवासात विलंब होण्याची शक्यता आहे.

# 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९८५



**आडवे शब्द**

१. 'तूच कर्ता आणि करविता' या गाण्याची पुढची ओळ
८. रागाचे मोजमाप
१०. जित्याची मेल्याशिवाय कशी जाईल!
११. मऊ
१२. राळ
१३. हनुमानाचे जयघोषातील नाव
१५. पाठीच्या कण्यातील हाड
१७. संधी
१९. लपलेली विहीर?
२२. तेंडुलकरांच्या 'गिधाडे'चे दिग्दर्शन करणारा ज्येष्ठ नट (नाव)
२३. औक्षणाची थाळी
२५. मुळाक्षरे
२७. कुलूप उघडणारी
२८. च्या बद्दल
३०. जेव्हा (हिंदी)
३२. खवलेले खोबरे
३३. लाकूड कापण्याचे साधन
३४. देव
३६. वस्त्र, कापड
३९. च्या सह
४१. उघड उघड
४२. गाडीचे छत
४४. राजबिंडा, तेजस्वी
४५. विनंती
४७. प्रजा
४९. निगरगट्ट
५०. आवाजाच्या पट्टीनुसार प्रशंसोद्गार किंवा दरडावण्याचा शब्द
५१. शाब्दिक हजामत
५२. महिना (हिंदी)
५४. श्रीमंत
५७. देवाकडे मागण्याचा पदार्थ?
५९. अफूचे बी
६१. टपाल
६३. काजळाचा एक शुष्क प्रकार
६५. सामान, वस्तू
६६. गुलाबजामूनचा रस
६७. हा पैशाअडक्याचा असतो आणि गुणांचाही
६९. कोलकताचे विमानतळ
७०. वरकड मोबदला
७१. धाक, दरारा
७२. डोळे
७४. अंत:करण
७५. पळून जाणे
७७. आवर घालणारी वादी
७९. च्या बरोबर
८०. धमकी, तंबी
८१. रबरापासून तयार केलेले, रबरासारखे
८२. मोगऱ्याची एक जात
८३. कामात घातल्यास अडथळा, मैदानावर दिल्यास खेळातील चाल

**उभे शब्द**

१. माशाची रास
२. लाज
३. पती, श्रीविष्णूचे एक नाव
४. तुज, तुळणा
५. अत्यंत किंमती, बहुमोल
६. कापड मोजण्याचे साधन
७. त्वरित
८. वाकबगार, तरबेज
९. संताप
१०. चाळीतील 'घर'
१४. ओबामांचे नाव
१६. एक उन्हाळी वेलवर्गीय फळ
१८. उसाचा घट्ट रस
२०. अर्थात!
२१. कोल्हापूरची महालक्ष्मी
२४. भक्कम, मजबूत
२६. बातमी
२८. भोट
२९. शोध, माग
३०. 'राजसा --- -- बसा, जीव हा पिसा'
३१. मालमत्ता, द्रव्य
३५. श्वासोच्छ्वास
३७. कमळ
३८. माणूसघाणा
४०. संन्याशाचे वस्त्र
४१. पोळ्यातील मुख्य माशी
४३. पावलोपावली, सतत
४४. राजेशाही संपली तरी हा हट्ट पुरवावाच लागतो!
४५. जिंकणारा
४६. अरण्यवास
४८. धातूचा धागा
४९अ.बौद्ध धर्मगुरु
५३. मल्ल
५५. लिहिणारा
५६. पहारेकरी
५८. फारच भयंकर
६०. माळ, हार
६२. कडक स्वाभावाची स्त्री
६३. फूल
६४. मोजणे
६५. आईचे वडील (संस्कृत)
६६. ध्रुपद
६८. शेतकऱ्यांसाठी शाप ठरलेला धंदा
७३. संगीतातील एक राग
७६. कौसल्यापुत्र
७८. नुसताच हाताला हात- -- म्हणणे
७९. उत्सव

### जम्बो शब्दकोडे क्र. ९८४ चे उत्तर

आडवे उत्तर १.दैनांदिनी ४.मौलिक ६.अर्धांगवायू १०.वरदान ११.वट १२.सर्दी १३.प्रासाद १४.व्रतबंध १६.भोग १७.पोर १९.अंत २०.धडक २२.वावटळ २४.जनावर २५.ओ २६.धमक २९.माज ३१.खडतर ३२.चेतावणी ३४.गाय ३६.पहेलवान ३७.रवरव ३८.यम ३९.तात ४०.रखमाई ४२.तलवार ४४.नफा ४८.टन ५०.रखवालदार ५४.काळ ५५.जवळपास ५८.कल ५९.गढी ६०.आभाळ ६१.खंत ६२.मौत ६३.मत ६४.काय ६६.मनकवडा ६९.खंत ७०.गोवा ७१.धनिक ७२.कथन ७५.लसूण ७६.सन ७७.गजानन ८०.कस ८१.पावा ८२.जस्त ८३.वारणे ८४.पो ८५.आटपाटनगर

उभे उत्तर : १.दैत्य २.दिवसाढवळ्या ३.नीरद ४.मौनव्रत ५.कटिबंध ६.अट ७.गवगवा ८.वाट ९.गर्दी १२.सरळ १५.धडधड १७.पोट १८.आजतागायत २१.कमतरता २३.वरचेवर २७.करवत २८.पाणी २९.माहे ३०.जलयान ३१.खनन ३३.वर्तमानकाळ ३५.यमल ३६.पगार ४१.खट ४३.वादळ ४५.फारकत ४६.खवा ४७.पूर ४९.खास ५१.खल ५२.लगत ५३.दाढी ५५.जखम ५६.वसन ५७.पालव ६०.आय ६३.मतलब ६४.कावा ६५.टाकणखार ६७.कर्तन ६८.डाक ७०.गोणपाट ७१.धनवान ७३.थकणे ७४.नस ७६.सपाट ७७.गज ७८.जास्त ७९.नवा


RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.


## थोडक्यात पण महत्वाचे...



## दिव्यांग बांधवांना साहित्य वाटप

लोणी काळभोर (दैनिक संध्या) : शारदादेवी माध्यमिक विदयालय नांदे येथील येथील सन २००४ च्या दहावी बॅचच्या विद्यार्थ्यांनी अधिक मासाचे निमित्त साधून सामाजिक बांधिलकी जपत दिव्यांग मुलांची निवासी शाळा आणि प्रौढ दिव्यांग निवासी शेती प्रकल्प अंबडवेट, गडदावणे रोड, तालुका- मुळशी येथील दिव्यांग बांधवांना आवश्यक असलेले साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमातून दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या दैनंदिन जीवनात उपयोगी पडणारे साहित्य देऊन त्यांना मदतीचा हात देण्यात आला. विविध मान्यवरांच्या उपस्थितीत दिव्यांग लाभार्थ्यांना साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी दिव्यांगांच्या समस्या जाणून घेत त्यांच्या सक्षमीकरणासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत संस्कार प्रतिष्ठान, आदित्य प्रांगण शाळेचे संस्थापक उल्हास केंजळे व्यक्त केले. या उपक्रमामुळे दिव्यांग बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून आयोजकांच्या सामाजिक कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक मच्छिंद्र जाधव, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रतिभा केंजळे उपस्थित होत्या. या कार्यक्रमासाठी अशोक रानवडे, विकास रानवडे, विनोद रानवडे, जयानंद रानवडे, संतोष रानवडे, अमित ढमाले, प्रमोद कदम, महेश जांभुळकर, मधुरा इंदलकर,अर्चना पिंगळे, जयश्री काळभोर, मीना हुलावळे, चांगुणा माकर, संतोषी पासलकर, प्रतिभा शिंदे, रेखा काटे, दिपाली जगताप ,सुरेखा धिडे, रेश्मा जराड, अश्विनी घोटकुले आदींनी आर्थिक स्वरूपात पंचवीस हजार रुपये मदत केली. या रकमेतून किराणा साहित्य गहू ,तांदूळ, तेल ,डाळी, कडधान्ये ,मसाले पदार्थ,लाडू व बिस्किटे आणण्यात आली .यावेळी शाळेचे संस्थापक अध्यक्ष उल्हास केंजळे यांनी दहावीच्या बॅचचे आभार मानले व अशी मिळालेली मदत आम्हाला नवीन ऊर्जा देईल असा विश्वास व्यक्त केला.

## बीएसएचने आणले पहिल्यांदाच 'परफेक्ट-फिट' चार दरवाजांचे साईड-बाय-साईड फ्रिज




पुणे (दैनिक संध्या) : भारतीय ग्राहकांना आता दिसायला सुंदर असतील, वापरण्यास सोपी असतील आणि त्यांच्या आधुनिक जीवनशैलीला साजेशा असलेल्या उपकरणांची आवड निर्माण झाली आहे. ग्राहकांची हीच गरज ओळखून ' बीएसएच होम अप्लायन्सेस प्रायव्हेट लिमिटेड' ने वेगाने वाढणाऱ्या साईड-बाय-साईड रेफ्रिजरेटरने बाजारात पाऊल ठेवले आहे. कंपनीने आपले नवीन 'बॉश' आणि 'सीमेन्स' ब्रँडचे चार दरवाजांचे साईड-बाय-साईड फ्रिज लाँच केले आहेत. प्रीमियम साईड-बाय-साईड फ्रीजचा लूक आणि बॉटम फ्रीझर (खाली फ्रीझर असणारी डिझाईन) ची सोय, या दोन्ही गोष्टी एकत्र करून ही नवीन खास शहरातील भारतीय कुटुंबांच्या गरजेनुसार तयार करण्यात आली आहे. आधुनिक शहरी घरांमध्ये आणि मॉड्युलर किचनमध्ये सहज बसेल अशा प्रकारे कमी जागेत जास्त साठवणूक क्षमता या फ्रीजमध्ये देण्यात आली आहे.हा देशातील असा एकमेव फ्रीज आहे जो तुमच्या किचनच्या ओट्याशी आणि कॅबिनेटशी अगदी तंतोतंत मेळ खातो, ज्यामुळे हा फ्रीज वेगळा न दिसता किचनचाच एक भाग वाटतो. यामध्ये काऊंटर-डेप्थ डिझाईन, जवळपास शून्य अंतराने इंस्टॉलेशन, ११५° वर असलेले भिंतीपासून संरक्षित दरवाजे, बदलण्याजोगे तापमान कप्पे आणि फ्रीझरसाठी खास कप्पे देण्यात आले आहेत. यामुळे भारतीय कुटुंबांना खाद्यपदार्थ साठवणे, ते व्यवस्थित ठेवणे आणि ताजे ठेवणे खूप सोपे जाईल. तसेच, हा फ्रीज तुम्ही किचनमध्ये स्वतंत्रपणे कुठेही ठेवू शकता, ज्यामुळे हा प्रत्येक आधुनिक भारतीय स्वयंपाकघरासाठी योग्य पर्याय ठरतो. या लाँचिंगच्या माध्यमातून बीएसएच कंपनी बॉश आणि सीमेन्स या दोन वेगवेगळ्या ब्रँड्स अंतर्गत ग्राहकांच्या बदलत्या गरजा पूर्ण करत आहे. 'बॉश साईड-बाय-साईड' फ्रीज हा भारतीय लोकांच्या खाण्यापिण्याच्या आणि साठवणुकीच्या सवयींचा सखोल अभ्यास करून बनवला गेला आहे, ज्यामुळे हा भारतातील सर्वात विचारपूर्वक डिझाईन केलेला फ्रीज ठरतो. यातील प्रत्येक वैशिष्ट्य भारतीय कुटुंबांना ताजेपणा आणि अधिक सोय देण्यासाठी तयार केले आहे.

# निरा-बारामती रोडवर 'द बर्निंग बस' चा थरार

## चालक धनंजय पवार व वाहक दिनेश मेश्राम यांचे प्रसंगावधान

**पणदरे-बारामती (दै. संध्या)**

बारामती-निरा मार्गावर धावणाऱ्या बारामती आगाराच्या सीएनजी बसला खामगळ पाटी (ता. बारामती) येथे आज सकाळी सवा सहा वाजता अचानक आग लागल्याने बस पूर्णपणे जळून खाक झाली.या घटनेत बसचालकाच्या प्रसंगावधानामुळे बसमधील तीन प्रवाशांचे प्राण वाचले असून बस जळाल्याने सुमारे ३५ ते ४० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

बारामती आगाराची सीएनजी बस क्रमांक (एम.एच.१४ बि.टी.४३२८ ) बारामतीहून निरेकडे जात असताना खामगळ पाटीजवळ दगड खाणीकडे जाणाऱ्या रस्त्यावर बसमधून धूर निघत असल्याचे



चालक धनंजय लिंबाजी पवार यांच्या निदर्शनास आले.त्यांनी तात्काळ बस रस्त्याच्या कडेला थांबवली.त्यांनी व वाहक दिनेश मेश्राम यांनी बसमधील तीन प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढले व प्रसंगावधान राखून तातडीने सिएनजी गॅसचा पुरवठा खंडित केला.काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केले आणि संपूर्ण बस आगीच्या भक्ष्यस्थानी पडली.यावेळी बसमधील अग्निशमन यंत्राने आग विझवण्याचा प्रयत्न केला.मात्र आग अधिकच तीव्र झाल्याने बसमधील आसने व टायर पुर्णतः जळाले होते.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे कर्मचारी तसेच वडगाव निंबाळकर पोलीस घटनास्थळी दाखल झाले.त्यांनी शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली.मात्र तोपर्यंत बस पूर्णपणे जळून खाक झाली होती.

### चौकशीसाठी असलेला फोन बंद

सदर विषयासंदर्भात माहिती घेत असताना बस स्थानकाचा असलेल्या फोन नंबर वरती फोन केले असता कर्मचारी फोन उचलत नाहीत तसेच काहींकडून उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली.बस स्थानक परिसरात प्रवाशांशी बोलत असताना काही प्रवाशांनी सदर फोन कायम बंद असल्याचे सांगितले, तसेच बसच्या संदर्भात विचारपूस अथवा चौकशी केली असता चौकशी विभागाचे कर्मचारी उत्तरे देण्यास टाळाटाळ करीत असतात.त्यामुळे बारामती तालुक्यातील तसेच इतरत्र असलेल्या प्रवाशांना यामुळे नाहक त्रास सहन करावा लागत आहे,याबाबतही नाराजी व्यक्त केली.

या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी राज्य परिवहन महामंडळाचे सुमारे ४० लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.या प्रकरणी वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस हवालदार देवकर तपास करीत आहेत.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बस स्थानक अभियान-२०२६ स्मार्ट बसस्थानक म्हणून महाराष्ट्र राज्यात बारामती बसस्थानकाने प्रथम क्रमांक पटकावला होता.राज्यात पहिला क्रमांक येऊन सुध्दा या आगारास आगार प्रमुख हे पद रिक्त असुन प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली आहे.

## हंगामा ओटीटीवर 'पर्सनल ट्रेनर २'चे पुनरागमन

**पुणे (दै. संध्या)**

पहिल्या सीझनला मिळालेल्या चांगल्या प्रतिसादानंतर हंगामा ओटीटीने आपली बहुप्रतीक्षित ओरिजिनल वेब सीरिज 'पर्सनल ट्रेनर 2' 18 जून 2026 रोजी प्रदर्शित केली आहे. मुंबईतील उच्चभ्रू फिटनेस क्षेत्राच्या ग्लॅमरस पण तितक्याच निर्दयी वातावरणावर आधारित या मालिकेत टीना दत्ता, आकांक्षा पुरी, पूनम पांडे आणि राहुल सुधीर प्रमुख भूमिकांमध्ये दिसणार आहेत. रहस्य, प्रेम, सत्तासंघर्ष आणि अनपेक्षित घडामोडींनी भरलेली ही सिरीज प्रेक्षकांना खिळवून ठेवणारा अनुभव देणार आहे. मुंबईतील एका प्रतिष्ठित जिममध्ये घडणारी ही कथा आहे. येथे सेलिब्रिटी, इन्फ्लुएन्सर्स आणि शहरातील उच्चभ्रू लोक आपल्या गुप्तपणे व्यायामासाठी येतात. चमकदार वातावरण आणि फिट शरीरांच्या मागे फसवणूक आणि सत्तेचे खेळ सुरू असतात. महत्त्वाकांक्षेच्या झगमगाटाखाली एक वेगळेच धोकादायक जग दडलेले आहे, जिथे आकर्षण हे एक हत्यार बनते, प्रत्येक कृतीत विश्वासघात दडलेला असतो आणि इच्छा माणसाला मर्यादेपलीकडे नेते. नाती बदलतात, मैत्री तुटते आणि परिस्थिती अधिकच धोकादायक बनत जाते. या जगात खरी ताकद केवळ शरीरात नसून, परिस्थिती आपल्या बाजूने वळवण्यात, टिकून राहण्यात आणि योग्य वेळी योग्य निर्णय घेण्यात असते.




आपल्या भूमिकेबद्दल बोलताना टीना दत्ता म्हणाली, "नेहा या व्यक्तिरेखेने मला सर्वप्रथम तिच्या अनेक पैलूंमुळे आणि अनपेक्षित स्वभावामुळे आकर्षित केले. ती बाहेरून जशी दिसते, तशी प्रत्यक्षात नसते. कथा पुढे जात असताना प्रेक्षकांना तिच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक नवे पैलू पाहायला मिळतील. तिच्या स्वभावातील विविध पैलू समजून घेऊन त्या पडद्यावर साकारताना मला खूप आनंद झाला. हे असे पात्र आहे जे सतत प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडते आणि मला वाटते की तिची कथा हळूहळू उलगडताना प्रेक्षकांना नक्कीच आवडेल." आपल्या भूमिकेबद्दल सांगताना आकांक्षा पुरी म्हणाली, "माया ही अत्यंत महत्त्वाकांक्षी, धाडसी आणि कोणत्याही आव्हानाला न घाबरणारी व्यक्ती आहे.

## विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम सर्व विभागांनी समन्वयाने यशस्वी करावा

### जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी

**पुणे (दै. संध्या)**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम शनिवार २० जूनपासून राबविण्यात येणार असून सर्व विभागांनी परस्पर समन्वय ठेवत हा कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डूडी यांनी केले.

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) कार्यक्रमाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित विविध विभागांच्या समन्वयाच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी उप जिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, जिल्हा परिषदेचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी राधाकिशन देवढे, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे उपायुक्त अण्णा बोदाडे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. डूडी यावेळी म्हणाले, पुणे जिल्ह्यात आजअखेर ९० लाख ८४ हजार ८८ इतकी मतदार संख्या असून ती राज्यात सर्वाधिक आहे. एकही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये व अपात्र मतदार यादीत समाविष्ट होऊ नये या उद्देशाने हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या पुनरिक्षणासाठी १ ऑक्टोबर २०२६ हा अर्हता दिनांक असणार आहे.

यावेळी श्रीमती कळसकर यांनी एसआयआर प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती दिली. त्या म्हणाल्या, या कार्यक्रमांतर्गत २० ते २९ जून या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना (बीएलओ) प्रशिक्षण व गणना अर्ज छपाई, ३० जून ते २९ जुलै या कालावधीत बीएलओंमार्फत घरोघरी भेटी देऊन अर्ज वितरण, ५ ऑगस्ट रोजी तात्पुरत्या मतदार यादीची प्रसिद्धी, ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर दावे आणि हरकती दाखल करणे, ५ ऑगस्ट ते ३ ऑक्टोबर दरम्यान दाखल हरकतींवर सुनावणी व ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

दावे व हरकती असल्यास किंवा मतदार नोंदणी अधिकारी यांना शंका असल्यास संबंधित विभागांना मतदार नोंदणी अधिकारी मतदाराचा जन्मदिनांक, जन्माचे ठिकाण, माता पिता किंवा त्यापैकी कोणीही भारतीय नागरिक नाही असे मतदारांची पारपत्र, व्हिसा पडताळणी, भारतात जन्म न झालेल्या मात्र नागरिकता स्वीकारलेल्या नागरिकांची परराष्ट्र मंत्रालयाअंतर्गत पडताळणी, मतदारांचे दिव्यांग दाखल्यावरून पडताळणी, मतदाराची शैक्षणिक कागदपत्रांतर्गत शाळा सोडल्याचे प्रमाणपत्रांची, दहावी उत्तीर्ण असल्याच्या प्रमाणपत्रांची पडताळणी, आदींसाठी योग्य कार्यपद्धतीने कळविण्यात येईल. दावे निकाली काढणे हे अत्यंत कमी



कालावधीत करावयाचे असल्याने विभागांनी विशेष कक्ष स्थापन करून गतीने पडताळणी करून आपला अभिप्राय सादर करावयाचा आहे, असे श्री. डूडी यावेळी म्हणाले.

जिल्ह्यातील सुमारे 45 लाख मतदारांचे मॅपिंग झाले आहे. या मतदारांसह उर्वरित मतदारांना बीएलओ घरोघरी जाऊन अर्ज वितरण करुन ते भरून घेणार आहेत. प्रमाणपत्रांच्या पडताळणीसाठी पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, जिल्हा परिषद, पारपत्र कार्यालय, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ येथे नोडल अधिकाऱ्यांची नेमणूक झाली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने आपल्या अधिनस्त महाविद्यालयातील स्वेच्छेने या कामात बीएलओंना मदत करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची नोंदणी करून निवडणूक कार्यालयाला त्याची माहिती द्यावी, ही श्रीमती कळसकर यावेळी म्हणाल्या.


बैठकीला विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय यांच्यासह पुणे, पिंपरी चिंचवड तसेच पुणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाचे अधिकारी, जन्म-मृत्यू नोंदणी विभागाचे प्रतिनिधी, भारतीय पारपत्र विभागाच्या अधिकारी, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विद्यार्थी विकास मंडळ आदी विभागांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## उपलब्ध पाणीसाठ्याचे काटेकोरपणे व्यवस्थापन करण्याचे जिल्हाधिकारी यांचे निर्देश

**पुणे (दै. संध्या)**

पुणे शहरासाठी महत्त्वाच्या खडकवासला, पानशेत, वरसगाव, टेमघर धरण समूहात उपलब्ध ४.१३ टीएमसी आणि पवना धरणातील १.६५ टीएमसी पाणीसाठ्याचे अत्यंत काटेकोरपणे व्यवस्थापन करावे, कोणत्याही परिस्थितीत पुणे जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होणार नाही, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने आवश्यक उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले.

पर्जन्यमान विश्लेषण, धरणातील पाणीसाठ्याचा आणि पाणीवापराचा जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष श्री. डुडी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी पुणे पाटबंधारे मंडळाचे अधीक्षक अभियंता प्रवीण कोल्हे, पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता पृथ्वीराज फाळके, उपजिल्हाधिकारी चारुशीला मोहिते, कार्यकारी अभियंता राजेंद्र डुबल, किरण देशमुख यांच्यासह इतर विभागाचे



वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी म्हणाले, खडकवासला, पानशेत, वरसगाव, टेमघर धरण समूहाची जिवंत साठा क्षमता २९.१५ टीएमसी असून ४.१३ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध आहे. तसेच पवना धरणामध्ये १.६५ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध आहे. पुणे व पिंपरी-चिंचवड महानगर क्षेत्राच्या दिनांक ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंतच्या अंदाजित अनुक्रमे ४ व १.५ टीएमसी पिण्याच्या पाण्याच्या गरजेनुसार योग्य नियोजन करावे, असे ते म्हणाले.

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका, नगरपरिषदा, ग्रामपंचायती, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व अन्य पाणी वापर वापरकर्त्या संस्थांनी उपलब्ध साठा व आगामी गरजा लक्षात घेऊन पाणी वापराचे पुनर्नियोजन करावे. धरणे, कालवे, नद्या व इतर जलस्रोतांमधील अनधिकृत व बेकायदेशीर पाणी उपसा रोखण्यासाठी महसूल, पोलीस व जलसंपदा विभागाच्या संयुक्त पथकांमार्फत विशेष तपासणी मोहीम राबवावी. सर्व संबंधित विभागांनी जलसाठा, पर्जन्यमान, आवक व पाणी वापराचा साप्ताहिक आढावा घेऊन त्याचा अहवाल जिल्हा प्रशासनास सादर करावा, असे श्री. डुडी यांनी सांगितले.

ते म्हणाले, परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता जलसंपदा विभागाने जलाशय प्रचलन- संवर्धन (कंझर्वेशन रिझर्व्हायर ऑपरेशन) धोरण अवलंबून जलाशय संचालन करावे व आवश्यकतेनुसार पुढील प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. येत्या कालावधीमध्ये धरणामध्ये पावसाचा येवा आल्यानंतर विसर्ग सुरू करण्यापूर्वी जिल्हा प्रशासनास अवगत करण्यात यावे.

शासनाच्या निर्देशानुसार ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करणे, पिण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेवलेला साठा संरक्षित ठेवणे, बेकायदेशीर पाणी उपसा रोखणे व नियमित आढावा घेणे, पुणे जिल्ह्यातील सर्व जलस्रोतांमधील उपलब्ध पाणीसाठ्याचा काटकसरीने वापर करणे, पिण्याच्या पाण्यास सर्वोच्च प्राधान्य देणे आणि राखीव साठा सुरक्षित ठेवणे याबाबत बैठकीत आढावा घेण्यात आला.

अनधिकृत मोटारी, पाईपलाईन, पंप व इतर साधनांवर आपत्ती व्यवस्थापन कायद्याच्या तरतुदीनुसार कठोर कारवाई करण्याबाबत महसूल यंत्रणेला सूचना बैठकीत देण्यात आल्या.

पुणे विभागात आजचा उपयुक्त जलसाठा ७७ टीएमसी (१४.३०टक्के) असून गतवर्षीच्या १६९.९ टीएमसी (३१.१६ टक्के) च्या तुलनेत सुमारे ९०.९ टीएमसी इतकी तूट असल्याचे श्री. कोल्हे यांनी सांगितले.

प्रारंभी श्री. कोल्हे यांनी भारतीय हवामान विभागाने व्यक्त केलेल्या एल-निनोच्या संभाव्य प्रभावाचा, पुणे विभागातील जलसाठ्याची सद्यस्थिती, गतवर्षीच्या तुलनेतील लक्षणीय तूट, जिल्ह्यातील प्रमुख धरणांमधील जलसाठा स्थिती, पर्जन्यमान विश्लेषण, संभाव्य धोके व आवश्यक उपाययोजनांची सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

## "ती नेहमीच्या चौकटीला छेद देते."

**पुणे (दै. संध्या)**

झी टीव्हीने 'वसुधा', 'गंगा माई की बेटियाँ' आणि 'तुम से तुम तक' या मालिकांसह सलग तीन आठवडे टीआरपी चार्टमध्ये अव्वल तीन स्थानांवर वर्चस्व राखले आहे.

या यशस्वी प्रवासाला पुढे नेत ही वाहिनी आता आपली नवीन मालिका 'तू ही रे दिल में' सह प्रेक्षकांचे मन जिंकत आहे. ही मालिका केवळ प्रेमकथा नाही, तर ती नशिब, नाती आणि आयुष्यातील अनपेक्षित वळणांचा शोध घेते. हे कथानक वृंदाभोवती फिरते. ती एक दयाळू मुलगी असून तिचे आयुष्य श्रद्धा आणि नशिबावर आधारलेले असते; पण एका अनपेक्षित घटनेमुळे तिच्या सर्व विश्वासांना तडा जातो.

आशा, हृदयभंग, त्याग आणि प्रेमाने भरलेल्या आणि भावनिक स्तर असलेल्या कथानकामुळे 'तू ही रे दिल में' ही मालिका प्रेक्षकांसोबत जोडली जात असून त्यांच्या मनाला भिडत आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळवण्यात येते की, निखील दत्तात्रय खलाटे यांची मौजे कांबळेश्वर, ता. बारामती, जि. पुणे येथील गट क्रं. १५४ मध्ये ०० हेक्टर ४२ आर क्षेत्र आहे. सदर मिळकती बाबत मे. दुय्यम निबंधक बारामती यांचे कार्यालयात दि.०५.०१.२०२३ रोजी हक्कसोडपत्र दस्त क्रं. २२१/ २०२३ हा दस्त केडगाव चौफुला ते यवत प्रवासादरम्यान हरविलेला आहे. सदर दस्त हरविले बाबतची तक्रार निखील दत्तात्रय खलाटे यांनी यवत पोलीस स्टेशन येथे दि.१७.०६.२०२६ रोजी नोंदविलेली असून त्याचा गु.र. नं. २९८/२०२६ असा आहे. सदर दस्त कोणाला मिळून आलेस त्यांनी वरील ठिकाणी संपर्क करावा ही विनंती.

सही/-
श्री. इंद्रजित विलास रगडे
ॲडव्होकेट
पत्ता - चौधरी प्लाझा, उरूळी कांचन, ता हवेली, जिल्हा - पुणे -
Contact No. - ९४२२३१३७८७ / ९७६५९१८७८७



## पुणे महानगरपालिका, पुणे

निविदा प्रक्रिया कक्ष
फेर निविदा जाहिरात - टेंडर नोटीस

पुणे अद्वितीय & Unique

विक्री कालावधी दिनांक : दि. १९/०६/२०२६ ते २६/०६/२०२६ दुपारी २:३० पर्यंत
स्विकृती दिनांक : दि. १९/०६/२०२६ ते २६/०६/२०२६ दुपारी २:३० पर्यंत
तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : २९/०६/२०२६ ०३:००

| निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रू. रू. | अंदाजित पुर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू. | कामाची मुदत (महिने) | अडचण आल्यास निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PMC/WATER_ SUPPLY/ 2026/103 | पाणी पुरवठा विभाग | कार्यकारी अभियंता क्र. २ अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्र. २६ मध्ये दैनंदिन देखभाल दुरूस्ती कामे करणे करिता, मजूर पुरविणे व इतर तदनुषंगिक कामे करणे. | रू. ६०७९/- | रू. ५९९८५२१/- | रू. ६०,०००/- | १२ | श्री. केतन जाधव ९९७०१३८२३१ |
| PMC/WATER_ SUPPLY/ 2026/108 | पाणी पुरवठा विभाग | कार्यकारी अभियंता क्र. २ अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्र. २२ मध्ये दैनंदिन देखभाल दुरूस्ती कामे करणे करिता, मजूर पुरविणे व इतर तदनुषंगिक कामे करणे. | रू. ६०७९/- | रू. ५९९९०९६/- | रू. ६०,०००/- | १२ | श्री. केतन जाधव ९९७०१३८२३१ |

अ) सदर कामांबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.

ब) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाइन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्व जबाबदारी टेंडरदाराची राहील.

क) ऑनलाईन निविदा प्रक्रीयेबाबतची संपूर्ण माहिती पाणीपुरवठा विभाग पुणे म.न.पा. येथे मिळेल.

ड) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि)/३२, दि.२२.०४.२०१६ नुसार बयाणा रक्कम ECS/RTGS/NEFT सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता
स्वारगेट पाणीपुरवठा विभाग
पुणे महानगरपालिका

*जाहिरात क्रमांक : २/२३९ दि. १८/०६/२०२६*

# पद्मश्री पुरस्कार प्राप्त रघुवीर खेडकर यांची समरसता लोककला संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड म्हणजे लोककलेचा सन्मान



■ काशिनाथ आल्हाट ■
तमाशा अभ्यासक तमाशा पंढरी
नारायणगाव 8830857875

भारत देशातील लोककलेच्या क्षेत्रात 'पद्मश्री' पुरस्कार प्राप्त झालेले पहिले मानकरी मास्टर कला भूषण रघुवीर खेडकर. आज संपूर्ण देशभरात त्यांच्या कर्तृत्वाची आणि त्यांच्या कलेविषयी चर्चा होत आहे.

समरसता मंचाचा एक मंत्र आहे.

"हिंदव : सोदरा सर्वे न हिंदू
पतितो भवेत | मम दीक्षा हिंदू
रक्षा,मम मंत्रम समानता ||"

'पद्मश्री' पुरस्कार प्राप्त रघुवीर खेडकर हे म्हणजे 'तमाशा कलेच्या माध्यमातून 'तमाशा कला आणि तमाशा फडातून ग्रामभक्ती, समाजभक्ती, राष्ट्रभक्तीचे आदर्श उदाहरण आहे. "कारण हिंदुत्वाची प्रतिके जर कुठे पाहावी? तर ती तमाशा कलेच्या क्षेत्रात' . तमाशाच्या रंगमंचावर आणि तमाशा फडात कोणताही भेद, मतभेद ,मनभेद, जातीभेद नसतो. "तिथे फक्त कला आणि कलाकार हा एकच समानतेचा भाव प्रत्येकाच्या मनात असतो" सामाजिक सम्मान ,निवारा आणि समानता सर्वांना लाभावी. एकता, समता, ममतेचे या मार्गाने चालावे. असे क्षेत्र म्हणजे 'तमाशा" होय. ही सर्व तत्वे रघुभाऊंनी जपली

म्हणूनच रघुवीर खेडकर यांना त्यांच्या कर्तृत्वाची पोहोच पावती "पद्मश्री' पुरस्काराच्याद्वारे मिळाली.

रघुवीर खेडकर यांना 'पद्मश्री' पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्राच्या अनेक ठिकाणी त्यांचा सन्मान , सत्कार, सोहळे मोठ्या प्रमाणात केले जात आहे. 'हा सत्कार ते अतिशय नम्रपणे स्विकारून 'लोककलेला' हा सन्मान समर्पित करतात.,'

बालगंधर्व पुणे येथे महाराष्ट्र राज्य शासन व समरसता लोककला संमेलन 2026 च्यावतीने आयोजित होणाऱ्या संमेलन अध्यक्ष पदासाठी 'पद्मश्री' रघुवीर खेडकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

खरं तर ! रघुवीर खेडकर यांचा रंगभूमीवरील प्रवेश हा वयाच्या पाचव्या दिवशी सुरू झाला. आणि अखंड 50 वर्ष रंगदेवतेची ते पूजा करत राहिले. रघुभाऊंची सकाळ ही टाळ ,तुणतुणे,हलगी, ढोलकी, चाळाच्या दर्शनाने व्हायची.

"सुमारे 50 वर्षाच्या कारकिर्दीतील संघर्षाचे जगणं आणि कलेचे संवर्धन काय असते? हे त्यांनी चार पर्व पाहिलीत ." आज जरी 'पद्मश्री' पुरस्काराने रघुवीर खेडकर सन्मानित होत असतील, महाराष्ट्राच्या अनेक ठिकाणी सन्मानित केले जात असेल, अथवा अध्यक्षपदाच्या पदासाठी त्यांची निवड केली जात असेल.' "ही पूर्व पुण्याई त्यांच्या मातापित्यांची आणि अखंड आयुष्यभर त्यांना ज्या ज्या कलावंतांनी त्यांच्या फडात ज्यांनी साथ दिली" ही पूर्व पुण्याई फळाला आली. असं म्हणावं लागेल. महाराष्ट्र शासनाच्या वतीने ज्येष्ठ कलावंतांना तमाशा मानधन दिले जाते. "परंतु तमाशा क्षेत्रातील असा एकमेव तमाशा फड मालक आहे. की, ते दर महिना जेष्ठ कलावंतांना त्यांच्या खात्यावर स्वतः पैसे टाकतात. मानधन देतात. त्यांचे उदरनिर्वाह चालवतात. तसेच दत्तृत्व काय असावे ? त्यांनी अनेक वस्तीगृहाच्या बांधकामाला आणि शाळां इमारतींसाठी आर्थिक मदत सढळ हाताने केली आहे.

या त्यांच्या कर्तुत्वात जर पाहिले गेले. तर, वयाच्या साडेतीन वर्षांपूर्वी बापाचे छत्र हरपले. "ज्याचे जगणे मुश्कील होते .,अशा माणसाला स्वतः कर्तुत्वातून 'पद्मश्री' पुरस्कार भेटतो आहे" ही जगण्याच्या संघर्षाची पावती आहे. अनेक ज्येष्ठ कलावंतांनी साथ सोडली नाही. आश्रय त्यांच्या डोक्यावर दिला. त्या छताच्या सावलीस ते कधी विसरले नाहीत. म्हणून रघुवीर खेडकर हे "पद्मश्री" पुरस्कारापर्यंत पोहोचले. असे मला वाटते.

"लोकनाट्याच्या क्षेत्रातील लोककलावंतांची निवड "पद्मश्री" पुरस्कारासाठी होणे हा फार मोठा दुर्लभ योगायोग आहे". कारण "जी माणसं तमाशा या क्षेत्राला आजपर्यंत नाक तोंड मुरडण्याचे काम करतात. आणि त्यांच्या हाती सत्ता. निवडीचे काम त्यांच्याकडे असल्यानंतर तमाशा कलावंताला "पद्मश्री" पुरस्कारापर्यंत जाणे शक्य नव्हते."परंतु कर्तुत्वाची अग्नी परीक्षा दिल्यानंतर यश हे नेहमी मिळतं"! याचे उत्तम उदाहरण म्हणजे "रघुवीर खेडकर आहेत"

रघुवीर खेडकर यांनी चार पर्व तमाशा क्षेत्राची पाहिली . तमाशा कसा होता ?काय होता? आणि त्याचा बदल कसा झाला ? आणि आज तमाशा कसा आहे? हे त्यांच्या अनेक भाषणातून आपण ऐकतात. या सर्व भाषणातून "तमाशा कला अखेरची घटका मोजत आहे" ही खंत ते स्पष्ट करतात."अश्लील चाळे करून लोकप्रियता मिळवणे. म्हणजे वाळूवरील वाऱ्याची लाट आहे" ती दीर्घकाळ टिकणारी नसते. परंतु त्यामुळे लोककलेचा ऱ्हास होतो .याची जाणीव रसिकांना यावी. यासाठी ते पोट तिडकिने बोलतात. त्यांचे बोलणे म्हणजे 'लोककलेचे संवर्धन होणे असा भाव आहे'. मा. रघुवीर खेडकर सह कांताबाई सातारकर हा तमाशा फड हा अस्तित्वात आला. श्रीनिवास पाटील यांची मदत आणि त्यांच्या बापानं भविष्याचा विचार करून 1969 साली काढलेला विमा याची आठवण करून दिल्याशिवाय रघुवीर खेडकर राहत नाही. 'खरं तर !रघुवीर खेडकर अनेक ठिकाणी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणतात , "मी अश्लीलता जपली असती?, तर मी कधीच सेलिब्रिटी झालो असतो !परंतु मी त्यातला नाही." मी महाराष्ट्राची संस्कृती जपणारा आणि हिंदूत्व जपणारा खरा कलाकार आहे".

'पद्मश्री' पुरस्कार प्राप्त रघुवीर खेडकर ज्याप्रमाणे कलाप्रेमी आहेत. त्याप्रमाणे खऱ्या अर्थाने मनुष्य प्रेमी आहेत.' ज्यावेळी त्यांच्या वडिलांचे निधन झाले. आणि त्यावेळी माता कांताबाई सातारकर यांच्यापुढे चार मुलांचा संगोपण ही मोठी समस्या निर्माण झाल्यानंतर ,निवारा शोधत त्या अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यात आल्या. आणि त्यांच्या आपुलकीचा ठेवा त्याठिकाणी होता. म्हणून त्यांच्या मैत्रिणीने त्या ठिकाणी सहारा दिला. तो सहारा रघुभाऊंनी प्राणा पेक्षा अधिक जपला. तो जिव्हाळा आजही तसाच आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात पहिला 'पद्मश्री' पुरस्काराचा किताब डॉ. विठ्ठलराव विखे पाटलांना सहकार क्षेत्रात मिळाला होता .तर या जिल्ह्यात दुसरा 'पद्मश्री' पुरस्कार भारतातील लोककलेच्या क्षेत्रातील रघुवीर खेडकर यांना मिळाला आहे. या पुढे संगमनेर तालुक्याची ओळख 'पद्मश्रींचा' तालुका अशी नव्याने ओळख होईल. 'पद्मश्री' पुरस्कार प्राप्त रघुवीर खेडकर यांचा साधा, भोळा, निर्मळ आणि गोड स्वभाव याचे नाते त्यांच्या कोकणच्या मातीशी नाळ जुळते आहे. "कोकणची माणसं साधी ,भोळी, नारळाच्या शहाळ्याच्या पाण्याप्रमाणे गोड असतात. त्याचे प्रतिबिंब म्हणजे रघुवीर खेडकर आहेत." ज्या ज्या व्यक्ती रघुवीर भाऊंच्या संपर्कात आल्या. त्यांना हा अनुभव आला असेल. 'पद्मश्री 'पुरस्कार प्राप्त मिळूनही आजही ते मातीवरचा माणूस आणि राहुटीतील माणसावर तेवढेच प्रेम करतात." 'हा सन्मान माझा एकट्याचा नसून, तमाम महाराष्ट्रातील लोक कलावंतांचा आहे' .अशी प्रांजळ भूमिका आपल्या मनातून व्यक्त करतात".

"ढोलकीच्या थापेने काळजाचे पाणी होतं, अन् चाळांच्या स्वरांनी जगाचं दुःख विसरते". असा तमाशा क्षेत्राचा बाज आहे.

कोविडच्या काळात रघुवीर खेडकर यांच्या घरावर डोंगरासारखं दुःख कोसळलं, पण ते दुःख बाजूला सारून रसिकांच्या चेहऱ्यावरील आनंदाचे फवारे त्यांनी कमी केले नाहीत" . 'रघुवीर खेडकर म्हणजे महाराष्ट्राच्या मराठमोळ्या काळ्याभोर मातीतील "सोंगाड्या" सोंगाड्या हा विनोदाच्या शाब्दिक कोटी करून सामाजिक भाष्य करून, समाजातील वाईट गोष्टीवर आणि राजकारणावर टीका करणारा असतो. ते अर्थपूर्ण शाब्दिक कोटी करून प्रेक्षकांच्या चेहऱ्यावर हास्य निर्माण रघूभाऊंनी केले.

## जिल्हाधिकारी यांचे कडून,

**जिल्हा पुणे**

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ व सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९७नुसारच्या (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम २०१८ अन्वये कलम ११(१) खालील अधिसूचना,

**क्रमांक : पीएफसी/कावी/४१/२०२६ दि. ९/०२/२०२६** ज्या अर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसुचना, महसुल व वन विभाग क्र. संकिर्ण ११/२०१४/प्र. क्र. ७७ (भाग-२) अ-२, दि. ११ सप्टेंबर २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश “उक्त अधिसुचना” असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसुचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हे उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी "समुचित शासन" असल्याचे मानण्यात येईल;

आणि ज्या अर्थी, उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेल्या, पुणे जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यांना यासोबत अनुसुची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त जमिनी" असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसुची दोन मध्ये दिलेले आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसुचित करण्यात येते की. उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यता भासण्याची शक्यता आहे:

आणि ज्या अर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे. यासोबत जोडलेल्या अनुसुची तीन मध्ये दिलेली आहेतः

आणि ज्या अर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश या सोबत जोडलेल्या अनुसुची चार मध्ये दिलेला आहे;

आणि ज्या अर्थी, कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसुची पाच मध्ये दिलेला आहे:

त्या अर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही;

परंतु उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल;

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्ह्याधिका-यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळन्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे) यांच्या नियम, १० च्या उप- नियम (३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भुमि अभिलेखाच्या अद्यावती करणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र.६), पुणे यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची - एक**

**जमिनीचे वर्णन**

**गाव - भिगवण** **तालुका - इंदापूर** **जिल्हा- पुणे**

| अ. क्र. | सर्व्हे नं./ गट नं. | अंदाजित क्षेत्र (हे. आर. चौ. मी.) | चतुः सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पूर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर |
| १ | १६२ | ०.०८.८० | १६१ | १६४ | १६३ | १७२ |
| २ | १६४ | ०.०९.५१ | १६२,१६३ | १६६,१६७ | भिगवण स्टेशन | १७२ |
| ३ | १६५ | ०.११.०० | १५६५,१५६३, १५६४, (न. क्र.भू) | १८४ | धर्मशाळा | १७० |
| ४ | १६६ | ०.०२.६६ | १६४ | १६८ | भिगवण स्टेशन | १६७ |
| ५ | १६८ | ०.०१.६९ | १६७ | १६९ | भिगवण स्टेशन | १७२ |
| ६ | २६५ | | १०९, ११० | २६३, २६४ | २७८ | धर्मशाळा |
| ७ | २६६ | | १०९, १११ | २६४, २६४ | २७९ | धर्मशाळा |
| ८ | २६७ | | १०९, ११२ | २६५, २६४ | २८० | धर्मशाळा |
| ९ | २६८ | | १०९, ११३ | २६६, २६४ | २८१ | धर्मशाळा |
| १० | २६९ | | १०९, ११४ | २६७, २६४ | २८२ | धर्मशाळा |
| ११ | २७० | | १०९, ११५ | २६८, २६४ | २८३ | धर्मशाळा |
| १२ | २७१ | ०.२०.६० | १०९, ११६ | २६९, २६४ | २८४ | धर्मशाळा |
| १३ | २७२ | | १०९, ११७ | २७०, २६४ | २८५ | धर्मशाळा |
| १४ | २७३ | | १०९, ११८ | २७१, २६४ | २८६ | धर्मशाळा |
| १५ | २७४ | | १०९, ११९ | २७२, २६४ | २८७ | धर्मशाळा |
| १६ | २७५ | | १०९, १२० | २७३. २६४ | २८८ | धर्मशाळा |
| १७ | २७६ | | १०९, १२१ | २७४, २६४ | २८९ | धर्मशाळा |
| १८ | २७७ | | १०९, १२२ | २७५, २६४ | २९० | धर्मशाळा |
| १९ | न. भू. क्र. १८५० व १८५१ | ०.१२.९६ | वस्तीकरिता जागा | २५६, १८४, २६३, २६४ | २६३, २६४ व २६५ २७७ | १६५व रेल्वे बॉन्ड्री |
| | | ०.६७.२२ | | | | |

**अनुसूची- दोन**

**प्रकल्पाचे नाव** : दौंड - सोलापूर विभागातील लेव्हल क्रॉसिंग गेट नं. २१ च्या जागी आरओबीचे बांधकाम कारणेकामी.

**प्रकल्पाचे वर्णन** : मौजे भिगवण, तालुका इंदापुर, जिल्हा पुणे, येथील दौंड सोलापूर सेक्शन मधील रेल्वे लाईन वरील लेव्हल क्रॉसिंग गेट नं. २१ वरील उड्डाण पूलाचे एलसी २१ (मलठण - भिगवण रस्ता सा.क्र. १२/४००) वरील रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकामाकरिता

**समाजाला मिळणारे लाभ** : सार्वजनिक वाहतूक सुरळीत व जलद गतीने होण्यास मदत होणार आहे.

**अनुसूची - तीन**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :-** बाधित व्यक्ती विस्थापित होतात किंवा कसे याची पडताळणी संयुक्त मोजणी झाल्यानंतरच तपासणी करून करणेत येईल.

**अनुसूची - चार**

**सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश :** भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ या ३०) महाराष्ट्र राज्याला लागू असताना (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम २०१८ याच्या कलम १० (क) नुसार राज्य शासनाने महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग यांचे कडील शासन राजपत्रातील अधिसूचना क्र. संकीर्ण-२०२५/प्र.क्र. १३/अ-३ दि. १३ मे २०२५ अन्वये प्रकरण २ व ३ च्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आलेली आहे.

**अनूसुचि- पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

अ. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याचे पदनाम :- आवश्यकता नाही.

आ. प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता :- आवश्यकता नाही.

इ. ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसुचनेचा तपशील :- आवश्यकता नाही.

**टिप :** उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. ६. पुणे यांचे कार्यालय येथे निरीक्षण करता येईल.

दिनांक :- ९/२/२०२६

ठिकाण :- पुणे

शिक्का

**जिमाका/पुणे/जाहिरात/८०/२०२६-२७**

**जितेंद्र डूडी**
**जिल्हाधिकारी, पुणे**

## थोडक्यात पण महत्वाचे...



### ठाकरेंच्या 6 खासदारांनी स्थापन केला वेगळा गट; लवकरच प्रवेश होणार : खा. बारणे

पिंपरी (दैनिक संध्या) : ठाकरे गटाच्या शिवसेनेतील ६ खासदारांनी स्वतंत्र गट स्थापन केला असून ते लवकरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश करतील, असा मोठा दावा शिंदे गटाचे मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी केला आहे. या घडामोडींमुळे राज्याच्या राजकारणात नव्या चर्चांना उधाण आले आहे. खासदार श्रीरंग बारणे यांनी माध्यमांशी संवाद साधताना सांगितले की, ही घटना अचानक घडलेली नसून गेल्या वर्षभरापासून संबंधित खासदारांमध्ये नाराजीची भावना होती. त्यांनी अनेकदा आपली खदखद व्यक्त केली होती. याबाबत उद्धव ठाकरे आणि पक्षातील वरिष्ठ नेत्यांनाही पूर्ण कल्पना होती. मात्र, नेमके कोणत्या दिवशी निर्णय घ्यायचा यावर चर्चा सुरू होती. अखेर त्याचे पडसाद आता उमटू लागले आहेत. श्रीरंग बारणे म्हणाले की, तथाकथित 'ऑपरेशन टायगर'च्या राजकीय घडामोडी सुरू असताना ते स्वतः दिल्लीत उपस्थित होते आणि संपूर्ण प्रक्रियेचे साक्षीदार होते. येत्या दोन ते तीन दिवसांत संपूर्ण चित्र स्पष्ट होईल. तसेच स्वतंत्र गट स्थापन करणारे ६ खासदार कोण आहेत, याचीही माहिती समोर येईल, असा दावा त्यांनी केला. दरम्यान, श्रीरंग बारणे यांच्या या वक्तव्यामुळे ठाकरे गटात खळबळ उडाली असून राज्याच्या राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा सुरू झाली आहे. संबंधित खासदारांकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. मात्र, पुढील काही दिवसांत या राजकीय घडामोडींना वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### महापौर, आयुक्तांसाठी आलिशान वाहनांची खरेदी; स्थायी समितीची ऐनवेळी मान्यता



पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने आयुक्त व महापौर यांच्यासाठी आलिशान वाहनांची खरेदी करण्यात येणार आहे. त्यासाठीच्या प्रस्तावास स्थायी समितीच्या बैठकीत बुधवारी (दि.१७) आयत्यावेळी मान्यता देण्यात आली. महापौर व आयुक्तांच्या दिमतीला वाहने असताना देखील वाहन खरेदी करत उधळपट्टी केली जात आहे. तर, बचत आणि काटकसरीचे धोरण राजकीय आणि प्रशासकीय प्रमुखांनीच फाट्यावर मारल्याचे हे उदाहरण आहे. आयुक्त यांच्या कार्यालयीन कामाकाजासाठी सात आसन क्षमता असलेले अलिशान वाहन खरेदी करण्यात येणार आहे. यासाठी निविदा न काढता मे. टोयाटो किर्लोस्कर मोटार प्राय. लि. या कंपनीकडे शासकीय दराची मागणी केली होती. कंपनीने एका वाहनासाठी १८ लाख ८० हजार ७२१ अधिक जीएसटी असा दर दिला आहे. तर वाहन नोंदणी, विमा, वाहतूक खर्च, परिवहन विमा हे वाहन खरेदीच्या वेळी लागू होणार आहे. यासाठी निविदा न मागवता कंपनीला आगाऊ रक्कम अदा करण्यात येणार आहे. त्याला स्थायी समितीने मान्यता दिली. आयुक्तांसह महापौर यांच्यासाठी देखील नवीन इलेक्ट्रीक वाहन खरेदी करण्यात येणार आहे. ते देखील थेट पद्धतीने खरेदी करण्यात येणार आहे. त्यासाठी महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीकडे दर मागविण्यात आले होते. कंपनीने महिंद्रा एक्सईव्ही ९५ या वाहनासाठी २९ लाख ३५ हजार ३६७ असा दर सादर केला आहे. तर यामध्ये देखील वाहन नोंदणी, विमा, वाहतूक खर्च, परिवहन विमा हे वाहन खरेदीच्या वेळी लागू होणार आहे. त्यामुळे हे वाहन सुमारे ३१ लाख रुपयांपर्यंत जाणार आहे. तर आयुक्तांसाठी खरेदी करण्यात येणाऱ्या वाहनाची किंमत २१ लाख रुपयांपर्यंत असणार आहे.

### पुणे-साईनगर शिर्डी एक्सप्रेस रेल्वेसेवेचा शुभारंभ

पिंपरी (दैनिक संध्या) : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते पुणे- साईनगर शिर्डी एक्सप्रेसला हिरवा झेंडा दाखवून रेल्वेसेवेचा शुभारंभ करण्यात आला. पुण्याची मोठी लोकसंख्या पाहता येथे मेगा टर्मिनस उभारणीच्या कामाला प्रारंभ करण्यात येत आहे. यासह पुणे रेल्वे स्थानक येथे ६ नवीन प्लॅटफॉर्म बनविण्यात येणार असून अस्तित्वातील ६ प्लॅटफॉर्मची लांबी वाढविण्यात येणार असल्याने रेल्वे हाताळणीची क्षमता दुप्पट होईल, अशी माहिती रेल्वेमंत्री वैष्णव यांनी यावेळी दिली. पुणे रेल्वे स्थानकात यार्डची रिमॉडेलिंगची पायाभरणी यावेळी श्री. वैष्णव यांच्या हस्ते करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार दूरदृष्य प्रणालीद्वारे या कार्यक्रमात सहभागी झाले. पुणे स्थानक येथे केंद्रीय नागरी विमानवाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, आमदार विवेक कोल्हे, मध्य रेल्वेचे महाप्रबंधक राजीव श्रीवास्तव, पुणे विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक राजेश कुमार वर्मा आदी यावेळी उपस्थित होते.

## महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते सन्मान

पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने नुकत्याच पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत राष्ट्रपती पदक विजेत्या "सर्वश्रेष्ठ दिव्यांगजन" तसेच इंडियन आयडॉल फेम अबोली जरीत यांचा सन्मान महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, क्रीडा, कला, साहित्य आणि सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे,माजी महापौर योगेश बहल,नगरसदस्य शत्रुघ्न काटे,अनिल घोलप, अर्चना करांडे, सुलभा उबाळे, प्रा. उत्तम केंदळे, माजी नगरसदस्या गिरीजा कुदळे, नगरसचिव मुकेश कोळप, उप आयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आदी उपस्थित होते.

याप्रसंगी अबोली जरीत म्हणाल्या, आज पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने झालेल्या या सन्मानामुळे मला अत्यंत आनंद होत आहे. या शहरात येण्याची आणि येथील विविध उपक्रमांची माहिती जाणून घेण्याची संधी मिळाली, याचा मला विशेष आनंद आहे. पिंपरी चिंचवडमध्ये आल्यानंतर मला दिव्यांग भवनला भेट देण्याची संधी मिळाली. हे दिव्यांग भवन पाहून मी खरोखरच भारावून गेले. इतक्या सर्वसमावेशक पद्धतीने उभारण्यात आलेले आणि दिव्यांग बांधवांच्या गरजा लक्षात घेऊन विकसित करण्यात आलेले असे दिव्यांग भवन मी यापूर्वी कधीही पाहिले नव्हते. भारतातील पहिले दिव्यांग भवन पाहण्याचा अनुभव माझ्यासाठी अतिशय प्रेरणादायी ठरला,येथे आल्यावर मला असे अजिबात वाटले नाही की मी पहिल्यांदाच या शहरात आले आहे.

माझ्या आयुष्यात अनेक चढ उतार आले. प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात काही ना काही अडचणी, संकटे आणि आव्हाने येत असतात. मात्र अशा परिस्थितीत खचून न जाता, स्वतःवर विश्वास ठेवून पुढे जात राहणे खूप महत्त्वाचे असते. आयुष्यात कितीही कठीण प्रसंग आले तरी हार मानायची नाही, हे मी स्वतःला नेहमी सांगत आले आहे. संघर्ष हा यशाच्या अडचणींपासून पळून न जाता त्यांचा सामना केल्यास त्यातून नवे मार्ग आणि नवी संधी निर्माण होत असते. त्यामुळे प्रत्येकाने आत्मविश्वासाने पुढे जात राहावे, स्वतःच्या स्वप्नांवर विश्वास ठेवावा आणि कोणत्याही परिस्थितीत आशा सोडू नये, असेही मत अबोली जरीत यांनी व्यक्त केले.

## जनगणनेचे काम करणाऱ्या शिक्षिकेचा विनयभंग

पिंपरी (दै. संध्या)



■ महापालिका कर्मचाऱ्या विरोधात गुन्हा दाखल

शासकीय जनगणनेचे काम पूर्ण करून परतणाऱ्या एका शिक्षिकेसोबत महापालिकेच्या कार्यालयातच गैरवर्तन झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. महापालिकेच्या 'फ' प्रभाग कार्यालयात ही घटना घडली. याप्रकरणी महापालिकेच्या नगर नियोजन विभागातील कर्मचाऱ्याविरुद्ध निगडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे महापालिका वर्तुळात खळबळ उडाली असून महिला सुरक्षेचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. निगडी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिलीप आडे (वय ४५) असे गुन्हा दाखल झालेल्या कर्मचाऱ्याचे नाव आहे. याबाबत पीडित शिक्षिकेने निगडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. एका खासगी शैक्षणिक संस्थेत कार्यरत असलेल्या ४७ वर्षीय शिक्षिका शासकीय जनगणनेच्या कामासाठी नियुक्त आहेत. पीडित महिला संबंधित काम पूर्ण करून महापालिकेच्या 'एफ' प्रभाग कार्यालयात आल्या होत्या. त्यावेळी तेथे उपस्थित असलेल्या महापालिकेच्या कर्मचाऱ्याने त्यांच्याशी गैरवर्तन केल्याचा आरोप केला आहे. या प्रकरणी निगडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून तांत्रिक तपास तसेच सीसीटीव्ही तपासणी सुरू आहे.

## 'आयर्नमॅन' विजेत्या थेरगावच्या कपूर दांपत्याचा गौरव

पिंपरी (दै. संध्या)

जगातील सर्वात कठीण आणि प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या 'आयर्नमॅन' या जागतिक क्रीडा स्पर्धेत ऐतिहासिक यश संपादन करून पिंपरी-चिंचवड शहराची मान जागतिक स्तरावर उंचावणाऱ्या थेरगाव येथील रहिवासी श्री. दिनेश कपूर आणि श्रीमती योगिता कपूर या दांपत्याचा पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभागृहात विशेष गौरव करण्यात आला. स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन या दांपत्याचा सत्कार करण्यात आला. जर्मनीतील हॅम्बर्ग येथे नुकत्याच पार पडलेल्या 'युरोपियन चॅम्पियनशिप'मध्ये कपूर दांपत्याने आपली जिद्द आणि चिकाटी सिद्ध केली. या स्पर्धेमध्ये ३.८ किलोमीटर पोहणे, १८० किलोमीटर सायकलिंग आणि ४२.२ किलोमीटर मॅरेथॉन धावणे हे तीन अत्यंत खडतर टप्पे एकाच दिवसात पूर्ण करावे लागतात. दिनेश कपूर आणि योगिता कपूर यांनी हे आव्हान लीलया पेलत अवघ्या १४ तास १३ मिनिटे २८ सेकंदांत ही स्पर्धा यशस्वीपणे पूर्ण केली आणि फिनिश लाईनवर भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवला.

## महापालिकेच्यावतीने महाराणा प्रतापसिंह यांना जयंतीनिमित्त अभिवादन

पिंपरी (दै. संध्या)

■ थोर पराक्रमी राजे महाराणा प्रतापसिंह यांनी मातृभूमीच्या स्वातंत्र्य आणि स्वाभिमानासाठी दिलेले योगदान भारतीय इतिहासात अजरामर : उपमहापौर शर्मिला बाबर



थोर पराक्रमी राजे महाराणा प्रतापसिंह यांनी मातृभूमीच्या स्वातंत्र्य आणि स्वाभिमानासाठी दिलेले योगदान भारतीय इतिहासात अजरामर आहे. त्यांच्या शौर्य, त्याग, संघर्ष आणि राष्ट्रनिष्ठेचा आदर्श आजही समाजाला प्रेरणा देणारा आहे. महाराणा प्रतापसिंह यांच्या जीवनकार्याचे स्मरण करून त्यांच्या शौर्य व स्वाभिमानाचा वारसा सर्वांनी जोपासावा असे प्रतिपादन उपमहापौर शर्मिला बाबर यांनी केले.


महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतीनिमित्त महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनातील त्यांच्या प्रतिमेस तसेच निगडी येथील पुतळ्यास उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी नगरसदस्य प्रा.उत्तम केंदळे, नगरसदस्या अनुराधा गोरखे, माजी नगरसदस्या सुमन पवळे,उप आयुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सामाजिक कार्यकर्ते अशोक इंगळे, प्रवीण राजपूत, ललित पवार, श्रीराम परदेशी,कल्याणसिंग राजपूत,भावेश गिरासे,सागरसिंग बघेल, डॉ. सुरेश सूर्यवंशी, रुपेश राजपूत, जितेंद्र पाटील, नितीन पाटील, राजेंद्रसिंग राठोड, महेंद्रसिंग गिरासे, मुकेश राणा, गणेश राजपूत, शुभम राजपूत, महेश पाटील, विनोद जाधव, परमेश्वर सोळंकी, एकनाथ पवार, ईश्वर परमार, चतुर्भुज चव्हाण, योगेश प्रतापसिंग तसेच राजपूत समाजाचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

## पिंपरी-चिंचवडला मिळणार 'पुस्तकांची नगरी' म्हणून नवी ओळख

पिंपरी (दै. संध्या)



येत्या काही वर्षांत पिंपरी-चिंचवडची ओळख केवळ उद्योगनगरी म्हणून नव्हे, तर 'पुस्तकांची नगरी', 'ज्ञाननगरी' आणि 'वाचन संस्कृतीचे केंद्र' म्हणून निर्माण करण्याची क्षमता या प्रकल्पामध्ये आहे. महाराष्ट्रातील अनेक नामवंत लेखक, साहित्यिक आणि प्रकाशन संस्थांचे हे आवडते केंद्र बनू शकते.

पिंपरी चिंचवड शहराला केवळ औद्योगिक नगरी म्हणून नव्हे, तर ज्ञान, साहित्य, संस्कृती आणि संशोधनाचे केंद्र म्हणून नवी ओळख मिळवून देण्याच्या उद्देशाने महापौर भा. रवि लांडगे यांच्या संकल्पनेतून 'अक्षरविश्व' या अत्याधुनिक ज्ञानसंकुलाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प साकार होत आहे. १५ जून २०२६ रोजी झालेल्या पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत मौजे भोसरी (कासारवाडी) येथील सार्वजनिक सुविधा क्षेत्रातील सुमारे ८,८३१.३६ चौरस मीटर जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे अत्याधुनिक ग्रंथालय आणि ज्ञानसंकुल उभारण्याच्या उपसूचनेस मान्यता देण्यात आली. हा प्रकल्प आनंदग्राम सामाजिक सेवाभावी संस्था, भोसरी यांच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे.

या प्रकल्पाचे वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण 'अक्षरविश्व' ज्ञानसंकुल कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) निधीतून उभारण्यात येणार असून महानगरपालिकेच्या निधीतील एकही रुपया खर्च होणार नाही. त्यामुळे शहरवासीयांना जागतिक दर्जाच्या ज्ञानसुविधा उपलब्ध होणार असून त्यासाठी महापालिकेवर कोणताही आर्थिक भार पडणार नाही. विशेष म्हणजे, प्रकल्पासाठी निधी कमी पडल्यास स्वतः आर्थिक योगदान देण्याची तयारी महापौर रवि लांडगे यांनी दर्शविली आहे.

'अक्षरविश्व' हे केवळ ग्रंथालय नसून एक सर्वसमावेशक ज्ञानसंकुल असेल. यामध्ये अत्याधुनिक ग्रंथालय, डिजिटल अभ्यासिका, ई-लायब्ररी, स्पर्धा परीक्षा अध्ययन केंद्र, संशोधन सुविधा, मराठी साहित्य परिषद कार्यालय, मनोमय कक्ष, व्याख्यान सभागृह, लेखक संवाद केंद्र, पुस्तक प्रकाशनासाठी स्वतंत्र सभागृह तसेच विविध शैक्षणिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक उपक्रमांसाठी आवश्यक सुविधा विकसित करण्यात येणार आहेत.

महापौर रवि लांडगे यांची संकल्पना शहरातील विद्यार्थी, युवक आणि अभ्यासकांना पुणे, मुंबई अथवा इतर महानगरांमध्ये उपलब्ध असणाऱ्या दर्जेदार ज्ञानसुविधा पिंपरी-चिंचवडमध्येच उपलब्ध करून देण्याची आहे. आज अनेक विद्यार्थी उच्च शिक्षण, स्पर्धा परीक्षा आणि संशोधनासाठी इतर शहरांकडे वळतात. मात्र 'अक्षरविश्व' उभारल्यानंतर पिंपरी-चिंचवड हेच अभ्यास, संशोधन आणि वाचन संस्कृतीचे प्रमुख केंद्र म्हणून विकसित होणार आहे.

या ज्ञानसंकुलामुळे राज्यातील आणि देशातील नामवंत लेखक, साहित्यिक, कवी, विचारवंत, संशोधक, शिक्षणतज्ज्ञ तसेच सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांचे शहरात सातत्याने आगमन होईल. साहित्य संमेलने, पुस्तक प्रदर्शने, व्याख्यानमाला, लेखक भेट कार्यक्रम, चर्चासत्रे आणि विविध सांस्कृतिक उपक्रमांमुळे शहरात समृद्ध बौद्धिक वातावरण निर्माण होईल.

## पिंपरी चिंचवड महापालिकेची १ जुलैपासून विशेष मालमत्ता कर वसुली मोहीम

पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागामार्फत चालू आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये मालमत्ता कर वसुलीला गती देण्यासाठी १ जुलै २०२६ पासून मालमत्ता कर वसुलीसाठी विशेष मोहीम हाती घेण्यात येणार आहे. मालमत्ता कर थकविणाऱ्या मालमत्ताधारकांना बिल वाटपासोबत जप्तीपूर्व नोटिसा देण्यात आल्या आहेत. त्यानंतरही कर भरणा न करणाऱ्या मालमत्ताधारकांविरोधात नियमानुसार कारवाई केली जाणार आहे. यामध्ये निवासी मालमत्तांचे पाणीपुरवठा कनेक्शन खंडित करणे तसेच व्यावसायिक आणि बिगरनिवासी मालमत्तांवर जप्तीची मोहीम राबविण्यात येणार आहे. महापालिकेकडून मालमत्ताधारकांना ३० जून २०२६ पर्यंत संपूर्ण मालमत्ता कर ऑनलाइन पद्धतीने भरल्यास सामान्य करावर १० टक्के सवलत दिली जात आहे. याशिवाय पर्यावरणपूरक उपक्रम राबविणाऱ्या मालमत्ताधारकांसाठी विविध प्रोत्साहनपर सवलतींचीही तरतूद करण्यात आली आहे. या सवलतींचा लाभ घेण्यासाठी अवघे १३ दिवस शिल्लक असल्याने नागरिकांनी विलंब न करता कर भरणा करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. मालमत्ता कर वसुलीला गती देण्यासाठी १ जुलैपासून सर्व विभागीय कार्यालयांमध्ये विशेष वसुली पथके तयार करण्यात येणार असून, मोठ्या थकबाकीदारांकडून वसुलीवर विशेष भर दिला जाणार आहे.

# आषाढी वारी पालखी सोहळ्याच्या नियोजनाबाबत महापालिकेत आढावा बैठक संपन्न

### वारकऱ्यांना सुरक्षित, स्वच्छ व सुविधायुक्त वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी विविध विभागांमध्ये समन्वय साधण्याच्या सूचना

पिंपरी (दै. संध्या)



संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज आषाढी वारी पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत नियोजन व आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. पालखी सोहळ्यादरम्यान वारकरी भाविकांना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होऊ नये तसेच सर्व आवश्यक सुविधा नियोजनबद्ध आणि सुरळीतपणे उपलब्ध करून देण्यासाठी विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा यावेळी घेण्यात आला.

बैठकीत पालखी मार्गावरील वाहतूक व्यवस्थापन, सुरक्षा व्यवस्था, स्वच्छता, आरोग्य सुविधा, आपत्कालीन सेवा तसेच वारकऱ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या विविध मूलभूत सुविधांबाबत चर्चा करण्यात आली. पालखी मार्गावर येणाऱ्या वारकरी भाविकांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुविधायुक्त वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने कार्य करावे, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या.

आषाढी वारी पालखी सोहळा हा राज्याच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचा महत्त्वाचा भाग असून लाखो वारकरी या सोहळ्यात सहभागी होत असतात. त्यामुळे पालखी मार्गावरील सर्व यंत्रणांनी आवश्यक तयारी वेळेत पूर्ण करून कोणतीही अडचण निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले.

यावेळी पालखी मार्गावरील वाहतूक नियोजन, आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी आवश्यक उपाययोजना, स्वच्छता व्यवस्थापन, आरोग्य सेवांची उपलब्धता तसेच विविध विभागांमधील समन्वय याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. पालखी सोहळा सुरक्षित, शिस्तबद्ध आणि यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने कार्य करण्यावर भर देण्यात आला.

या बैठकीस महापौर रवि लांडगे, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, शहर सुधारणा समिती सभापती संजय काटे, महिला व बालकल्याण समिती सभापती राणी पठारे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, नगरसदस्य बापू घोलप, उत्तम केंदळे, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, सह आयुक्त मनोज लोणकर, सहशहर अभियंता अनिल भालसाखळे, महेश कावळे, उप आयुक्त अण्णा बोदडे, प्रदीप ठेंगल, अतुल पाटील, व्यंकटेश दुर्वास, ममता शिंदे, राजेश आगळे, चेतना केरूरे, क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे, परशुराम वाघमोडे, अजिंक्य येळे, पूजा दुधनाळे, अश्विनी गायकवाड, सहाय्यक आयुक्त उमा दर्वेश, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे,पोलीस उप आयुक्त विक्रांत देशमुख, धिरज पाटील, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल यांच्यासह पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे सहाय्यक पोलीस आयुक्त सतिश नांदुरकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन लांडगे, महेश बनसोडे, विनोद पाटील, वर्षाराणी पाटील, गोरख कुंभार, प्रमोद वाघ, सहाय्यक पोलीस निरीक्षक आदिनाथ महानवर, ज्ञानेश्वर धनगर, मोटार वाहन निरीक्षक विजय चौधरी, महामेट्रोचे चीफ डेव्हलपटमेंट मॅनेजर संदीप दुबे, चीफ रेसिडेंट इंजिनीअर यतेंद्र कुलकर्णी, देहू संस्थान विश्वस्त ह. भ. प. उमेश मोरे, आळंदी संस्थान विश्वस्त ॲड. रोहिणी पवार, चैतन्य कबीर महाराज, ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा प्रमुख ॲड. राजेंद्र उमाप यांच्यासह महावितरण तसेच संबंधित विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

पालखी सोहळ्यादरम्यान वारकरी भाविकांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी वाहतूक, स्वच्छता, आरोग्य आणि सुरक्षा व्यवस्थेचे सर्वंकष नियोजन करण्यात आले आहे. सर्व यंत्रणांच्या समन्वयातून सोहळा सुरळीत आणि सुरक्षित पार पाडण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे.
**- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

### वारकऱ्यांच्या सेवेसाठी महापालिका सज्ज

आषाढी वारी पालखी सोहळ्यादरम्यान वारकरी भाविकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये यासाठी महानगरपालिकेकडून आवश्यक नियोजन करण्यात येत असून स्वच्छता, आरोग्य, पिण्याचे पाणी, वाहतूक आणि सुरक्षा व्यवस्थेसह विविध मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाकडून सर्वंकष तयारी करण्यात येत आहे.

आषाढी वारी पालखी सोहळा हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि अध्यात्मिक परंपरेचा महत्त्वाचा भाग आहे. वारकरी भाविकांना सुरक्षित, स्वच्छ आणि सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिका पूर्णपणे सज्ज असून सर्व विभागांच्या समन्वयातून आवश्यक नियोजन करण्यात आले आहे.
**- रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

## थोडक्यात पण महत्वाचे...




### खेत बचाव अभियान उत्साहात संपन्न

■ युवा पिढीने शेती संवर्धनासाठी सक्रियपणे पुढाकार घ्यावा मान्यवरांचे आवाहन

नारायणगाव (दैनिक संध्या) : महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्न कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, नारायणगाव येथे कृषी कार्यानुभव (RAWE) कार्यक्रमांतर्गत आयोजित करण्यात आलेले "खेत बचाव अभियान" उत्साहात संपन्न झाले. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून प्रजापिता ब्रह्माकुमारी संस्थेचे तज्ज्ञ मार्गदर्शक बी.के. राजूभाई, बी.के. शशिकांतभाई, बी.के. संगीता दीदी आणि बी.के. उषा दीदी उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना शाश्वत शेती, पर्यावरण संवर्धन, नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण तसेच मूल्याधिष्ठित जीवनशैली याविषयी मार्गदर्शन केले. शेती व पर्यावरण यांचे अतूट नाते स्पष्ट करताना युवा पिढीने शेती संवर्धनासाठी सक्रियपणे पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद भुजबळ होते. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी वर्ग तसेच कृषी व्यवसाय व्यवस्थापन विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामोन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष कृषिरत्न अनिल मेहेर, अध्यक्ष सुजित खैरे तसेच संचालक मंडळ यांचे वेळोवेळी प्रोत्साहन व सहकार्य लाभले. कार्यक्रमादरम्यान शेती संवर्धन, जल व मृदा संरक्षण तसेच पर्यावरणपूरक कृषी पद्धतींबाबत जनजागृती करण्यात आली. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला असून शेती व पर्यावरण संरक्षणाचा महत्त्वपूर्ण संदेश देणारा ठरला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रांजल लांडे हिने केले, तर आभार प्रदर्शन सिद्धी थिगळे हिने केले.



### शिरूर पोलिसांची धडाकेबाज कारवाई : तीन गावठी पिस्तुले व चार जिवंत काडतुसे जप्त

■ एकूण १ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

कवठे येमाई (दैनिक संध्या) : शिरूर पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने अवैधरित्या गावठी पिस्तूल बाळगणाऱ्या दोन आरोपींना अटक करून त्यांच्याकडून तीन गावठी पिस्तुले व चार जिवंत काडतुसे असा एकूण १ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण व डीबी पथक गस्त घालत असताना त्यांना गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळाली की, विजय उर्फ कोयत्या गोविंद शेंडगे वय ३१, रा. आमदाबाद, ता. शिरूर हा न्हावरे परिसरात पिस्तूल घेऊन फिरत आहे. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. त्याच्या कमरेला एक गावठी पिस्तूल व दोन जिवंत काडतुसे आढळून आली. या प्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात शस्त्र अधिनियम १९५९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील चौकशीत आरोपी विजय शेंडगे याने बापू कोंडीबा पारखे वय ३१, रा. सरके वस्ती, निमोणे, ता. शिरूर याच्याकडे दोन पिस्तुले व दोन काडतुसे दिल्याची माहिती दिली. पोलिसांनी त्याच्याकडूनही दोन गावठी पिस्तुले व दोन जिवंत काडतुसे जप्त केली आहेत. दोन्ही आरोपींना न्यायालयात हजर केले असता १८ जून पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. विशेष म्हणजे मुख्य आरोपी विजय उर्फ कोयत्या गोविंद शेंडगे याच्यावर यापूर्वी खून, जबरी चोरी, विनयभंग व मारहाण यांसारखे गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती शिरूर पोलिसांनी दिली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल, अपर पोलीस अधीक्षक डॉ. शुभमकुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले व पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण व पोलीस हवालदार अक्षय कळमकर, पोलीस अंमलदार नितेश थोरात, विजय शिंदे, निरज पिसाळ, निखील रावडे, सचिन भोई, अंबादास थोरे, रविंद्र काळे, अजय पाटील, दादाराव नागरे यांचे पोलीस पथकाने केलेली आहे.

### जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा गावठाण कवठे येमाई येथे शैक्षणिक वर्षाला प्रारंभ



कवठे येमाई (दैनिक संध्या) : जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा गावठाण कवठे येमाई येथे आगामी शैक्षणिक वर्ष २०२६/२७ ला मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला. दि. १५ जून शाळेचा पहिला दिवस.इयत्ता पाहिलीत शिकण्यासाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या पाल्यांनी आपल्या पालकांसह मोठीच उपस्थिती लावली. याच प्राथमिक मराठी शाळेत इतर वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणारे वाड्या वस्त्यांवरील पाल्य आपल्या पालकांसमवेत पहिल्याच दिवशी शाळेत गर्दी करताना दिसत होते.एक गुणवत्तावान प्राथमिक शाळा म्हणून कवठे गावठाणातील ही जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा असून या शैक्षणिक वर्षात एकूण सुमारे २४० विद्यार्थी,विद्यार्थिनी या शाळेत शिक्षणाचे बाळकडू घेत घेत असल्याची माहिती मुख्याध्यापिका रंजना गावडे,खोमणे यांनी दिली.शिरूरच्या पश्चिमेकडील कवठे येमाई गावठाणातील जिल्हा परिषदेची प्राथमिक केंद्र शाळा या भागातील एक नामांकित व गुणवत्ता वाण मराठी शाळा असून शाळेत अध्यापन करणारे शिक्षक,शिक्षिका ज्ञानदानाची जबाबदारी ओळखून मुलांना समजेल अशा सोप्या व सुलभ भाषेत शिकविण्याचे कार्य करीत असल्याने शाळेने शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्याचे काम सातत्याने सुरु ठेवले आहे. शैक्षणिक,क्रीडा,शिष्यवृत्ती व इतर कोणत्याही शालेय स्पर्धात्मक परिक्षा असोत या शाळेतील गुणवंत विद्यार्थी शाळेचा गावाचा नाव लौकिक वाढवत आहेत. या यश पाठीमागे या शाळेत कार्यरत असणारे व परिश्रमपूर्वक ज्ञानदानाचे कार्य करणारे शिक्षक यांचे ही तितकेच मोठे योगदान आहे.शाळा व्यवस्थापन समिती,शिक्षणप्रेमी कवठे ग्रामस्थ देखील शाळेला वेळोवेळी योग्य ती मदत करीत प्रोत्साहन देण्याचे कार्य करीत आहेत.शाळेच्या मुख्याध्यापिका रंजना गावडे, त्यांच्या सर्व महिला शिक्षक सहकारी,शिक्षक,व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भरत भोर,उपाध्यक्ष डॉ.आरती उचाळे,अर्चना देवकर,समितीचे संचालक भाऊसाहेब घोडे व समितीतील सर्वच सहकारी शाळे च्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचे दिसून येते. याच मराठी प्राथमिक शाळेस मॉडेल स्कुलचा दर्जा मिळाला असून त्यादृष्टीने पालकांचा ही कल आपल्या पाल्यांना या मराठी शाळेत प्रवेश घेण्याकडे वाढलेला आहे.

# प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार : महेश ढवळे

## राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे यांच्या हस्ते लाभार्थ्यांना शिधापत्रिकांचे वितरण

बारामती (दै. संध्या)



राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे यांच्या हस्ते अंत्योदय योजनेंतर्गत तसेच प्राधान्य कुटुंबातील योजनेतील विविध पात्र व गरजू 35 लाभार्थ्यांना बारामती तहसील कार्यालय येथे आयोजित कार्यक्रमात शिधापत्रिकांचे वितरण करण्यात आले. प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळाला पाहिजे या दृष्टीने आयोग कार्यरत आहे, असे श्री. ढवळे यावेळी म्हणाले.

बारामती तालुक्यातील पुरवठा विषयक कामकाजाच्या आढावा बैठकीनंतर या शिधापत्रिकांचे वाटप करण्यात आले. यावेळी राज्य अन्न आयोगाचे सदस्य रणजीत निंबाळकर, तहसिलदार स्वप्निल रावडे, पुरवठा निरीक्षण अधिकारी बारामती तितिक्षा बारापात्रे, पुरवठा निरीक्षक अशोक कचरे, गोदाम व्यवस्थापक सौरभ इंगळे यांच्यासह संबंधित विभागांचे कर्मचारी व शिधापत्रिकाधारक उपस्थित होते.

या कार्यक्रमात अंत्योदय योजनेमध्ये दिव्यांग, परितक्त्या, दुर्धर आजाराने ग्रस्त असलेल्या 15 लाभार्थ्यांना तसेच प्राधान्य कुटूंब योजनेच्या दारिद्र्य रेषेखालील कुटूंबे, भूमीहिन शेतमजूर व ऊसतोड कामगार तसेच अंत्योदय योजनेतून वगळलेले मात्र आर्थिकदृष्ट्या दुर्बल अशा 20 गरजू लाभार्थ्यांना शिधापत्रिकांचे वितरण करण्यात आले. श्री. ढवळे म्हणाले, गरजू नागरिकांना आरोग्याच्या दृष्टीने सकस, स्वच्छ आणि दर्जेदार अन्न मिळाले पाहिजे. या माध्यमातून राज्यातील नागरिक भीकमुक्त, भूकमुक्त आणि कुपोषणमुक्त झाला पाहिजे. एकही नागरिक उपाशी राहणार नाही, या दृष्टीने राज्य अन्न आयोग कार्य करीत आहे.

ते पुढे म्हणाले, केंद्र व राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून नागरिकांना त्यांचा लाभ मिळवून द्यावा व त्यांना सन्मानाने जगण्याचा अधिकार प्राप्त करून द्यावा. शिधापत्रिकेसंबंधित प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढून पात्र नागरिकांना शिधापत्रिका उपलब्ध करून द्याव्यात. एकही नागरिक किंवा बालक अन्नापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

भिक्षेकऱ्यांवर केवळ कारवाई करून प्रश्न सुटणार नाही, तर त्यांच्या संगोपन व समुपदेशनाची गरज आहे. बालभिक्षेकऱ्यांसाठी निवाऱ्यांची व्यवस्था करावी. भीक मागण्यास प्रवृत्त करणाऱ्यांवर कारवाई करावी. भीक मागणे व भीक देणे हा गुन्हा असून भीक मागण्याचे कारण शोधून त्या नागरिकांना शासनाच्या योजनांचा फायदा करुन देणे हेच महाराष्ट्र राज्य अन्न आयोगाचे निकष आहेत. जिल्ह्याबाहेरील ऊसतोड कामगारांची नोंद घेऊन त्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, आढावा बैठकीत श्री. ढवळे यांनी निर्देश दिले.

यावेळी बैठकीच्या अनुषंगाने तहसीलदार श्री. रावडे यांनी माहिती सादर केली.

## विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी कटीबद्ध - विजयसिंह शिंदे

चाकण (दै. संध्या)

माणसाच्या " माणूस " होण्यात " शाळा " या संस्थेने नेहमीच फार मोठी कामगिरी केली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी मी सदैव कटिबद्ध राहील, असे ठोस आश्वासन खेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती व जिल्हा परिषदेचे गटनेते विजयसिंह शिंदे पाटील यांनी येथे दिले. खेड तालुक्यातील निमगाव दावडी, साबळेवाडी, भोसे आदी शाळेत नवगत विद्यार्थ्यांचा सन्मान करताना शिंदे पाटील बोलत होते.



शिंदे पुढे म्हणाले," मे महिन्याच्या सुट्टीनंतर पावसाच्या सरींसोबत, मातीचा सुगंध घेत शाळेत जाणे... नवीन ड्रेस, दप्तर, छत्री, पहिल्या बाकासाठीची भांडणे आणि नवीन कोऱ्या पुस्तकांचा तो सुगंधी वास... आयुष्यभर मनात साठून राहणारा हा क्षण असतो. माणूस कितीही मोठा झाला, तरी बालपणाचे ते सोनेरी दिवस कधीच विसरता येत नाही. नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी, जिल्हा परिषद शाळेत चिमुरड्या विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शिंदे स्वतः उपस्थित होते.

## जि.प.पूर्ण प्राथमिक आदर्श शाळा कोंडमळा नं.१ येथील शाळा प्रवेशोत्सव उत्साहात

चिपळूण (दै. संध्या)



निरागस, गोंडस, प्रफुल्लित, चेहऱ्यावर आनंद अशी ही मुले पहिल्यांदाच शाळेत प्रवेशकर्ते होणार म्हणून त्यांचा आनंद ओसंडून वाहत असतो.शाळेतील पहिला दिवस त्यांच्यासाठी नवपर्वणीच असते.असा आगळा वेगळा१ली तील नवगतांचा शाळा प्रवेशोत्सव चिपळूण तालुक्यातील मु.कोंडमळा येथील जि.प.शाळा पूर्ण प्राथमिक शाळा कोंडमळा नं.१येथे मोठ्या उत्साहात झाला. सर्व प्रथम नवीन प्रवेशकर्त्या मुलांची सजविलेल्या रिक्षा मधून ड्रमबीट आणि विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकासह वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सवाद्य प्रभातफेरीतून पंचक्रोशीतील वातावरण प्रफुल्लित झाले होते.१ली मध्ये प्रवेश घेणाऱ्या मुलांचे पेपर वर नाव लिहून त्यांच्या पायाचे ठसे घेत,औक्षण करुन आनंदी,सुहास्यवदनाने उत्साहात प्रवेश देण्यात आला. हा क्षण सर्वांसाठी भावूक, आनंददायी, प्रेरणादायी असाच होता.शालेय शिक्षणाचा पहिला दिवस विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा क्षण असल्याने त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद द्विगुणित झाला होता.कार्यक्रमाची संकल्पना विलोभनीय अशीच होती.जि.प.पूर्ण प्राथमिक आदर्श शाळा नं.१येथील नवगतांच्या या आयोजित प्रवेशोत्सवासाठी शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन समिती, पालक, ग्रामस्थ यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी झाला.हा नवगतांचा प्रवेशोत्सव माजी विद्यार्थ्यांनी पाहिल्यानंतर त्यांनाही आनंद झाला आहे.

लहानपण देगा देवा!या प्रमाणे या शाळेचे माजी विद्यार्थी, समाजसेवक व कोंडमळाचे सुपुत्र अरविंद सुर्वे यांनी सर्वांचे कौतुक करत त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देत अभिनंदन केले आहे.

## व्हीपीकेबीआयईटीच्या प्राध्यापकांना ब्राझीलच्या मारिंगा राज्य विद्यापीठाकडून आंतरराष्ट्रीय अभ्यागत प्राध्यापक अनुदान प्राप्त

बारामती (दै. संध्या)



बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या कमलनयन बजाज अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान संस्थेच्या (व्हीपीकेबीआयईटी) स्थापत्य अभियांत्रिकी विभागातील सहायक प्राध्यापक डॉ.समाधान जी.मोरखडे यांना ब्राझीलच्या मारिंगा राज्य विद्यापीठाकडून (युनिव्हर्सिडाडे एस्टाडुआल डी मारिंगा – यूईएम) प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय अभ्यागत प्राध्यापक अनुदान(International Visiting Professor Grant ) प्रदान करण्यात आले. या मान्यतेचा एक भाग म्हणून,डॉ. समाधान मोरखडे आणि डॉ.गिरीधर नरुले यांनी शैक्षणिक आणि संशोधन सहकार्यात सहभागी होण्यासाठी दि 22 मे 2026 ते 2 जून 2026 दरम्यान यूईएमला भेट दिली.त्यांच्या भेटीदरम्यान,त्यांनी प्राध्यापक कार्लोस हुंबेर्तो मार्टिन्स आणि इतर प्राध्यापक व संशोधकांशी संवाद साधला आणि स्थापत्य व संरचनात्मक अभियांत्रिकी क्षेत्रातील संयुक्त संशोधन,आंतरराष्ट्रीय प्रकाशने आणि शैक्षणिक आदान-प्रदान कार्यक्रमांच्या संधी शोधल्या. त्यांनी प्रगत प्रयोगशाळा आणि चालू संशोधन सुविधांनाही भेट दिली, ज्यामुळे त्यांना शाश्वत पायाभूत सुविधा आणि आधुनिक बांधकाम तंत्रज्ञानातील नाविन्यपूर्ण कार्याची माहिती मिळाली. या भेटीमुळे अर्थपूर्ण ज्ञान आदान-प्रदान सुलभ झाले आणि दोन्ही संस्थांमधील भविष्यातील सहकार्यासाठी पायाभरणी झाली.

डॉ.मोरखडे यांनी व्यक्त केले की, आंतरराष्ट्रीय अभ्यागत प्राध्यापक अनुदान (International Visiting Professor Grant) मिळणे हा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे आणि जागतिक संशोधन उपक्रमांमध्ये योगदान देण्याची एक संधी आहे. त्यांनी यावर जोर दिला की,अशा आंतरराष्ट्रीय अनुभवामुळे अध्यापन-अध्ययन प्रक्रिया सुधारते आणि उच्च-गुणवत्तेच्या संशोधनाला प्रोत्साहन मिळते.

ब्राझीलमधील अग्रगण्य सार्वजनिक विद्यापीठांपैकी एक असलेले मारिंगा राज्य विद्यापीठ (State University of Maringá), आपल्या मजबूत संशोधन परिसंस्थेसाठी (research ecosystem) आणि जागतिक शैक्षणिक सहकार्यासाठी ओळखले जाते.या मान्यतेमुळे आणि भेटीमुळे संस्थात्मक संबंध अधिक दृढ होण्याचे मार्ग खुले होण्याची अपेक्षा आहे, ज्यामुळे VPKBIET आणि UEM या दोन्ही विद्यापीठांतील विद्यार्थी आणि प्राध्यापकांना फायदा होईल.

हे यश VPKBIET ची शैक्षणिक उत्कृष्टता,संशोधनातील नावीन्य आणि जागतिक सहभागाप्रती असलेली निरंतर वचनबद्धता दर्शवते. याबद्दल डॉ.समाधान मोरखडे आणि डॉ. गिरीधर नरुले यांनी व्यवस्थापन समिती,विद्या प्रतिष्ठान,प्राचार्य,डॉ. सुधीर लांडे आणि विभाग प्रमुख,डॉ.चित्तरंजन नायक यांचे आभार मानले.

मुख्यमंत्री बळीराजा शेत पानंद रस्ता विधानसभा क्षेत्र स्तरीय समितीवर

## शिरूर तालुक्यातील शेतकरी नेत्यांची निवड




कवठे येमाई (दै. संध्या)

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास तसेच शेतमालाच्या सुलभ वाहतुकीसाठी बारमाही शेत रस्त्यांचे जाळे उभारण्याच्या उद्देशाने शासनाने विधानसभा क्षेत्र स्तरीय मुख्यमंत्री बळीराजा शेत पानंद रस्ता समिती स्थापन केली आहे. शिरूर तालुक्यात ही समिती आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊली आबा कटके यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आली आहे. समितीवर अशासकीय सदस्य म्हणून शिरूर पंचायत समितीचे माजी सदस्य व शेतकरी नेते राजेंद्र पोपटराव गदादे (तांदळी), राजीव वसंतराव फराटे पाटील, विजय सोमनाथ रणसिंग, श्यामराव शहाजी पवार आणि नवनाथ विश्वनाथ हरगुडे यांची निवड करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या या समितीमुळे वर्षानुवर्षे प्रलंबित असलेले शेतरस्ते, वाहतूक व इतर शेतीसंबंधित प्रश्न मार्गी लागण्यास मदत होईल, असा विश्वास शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.दरम्यान, समितीवर निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे शेतकरी, सामाजिक व राजकीय क्षेत्रातून अभिनंदन होत असून त्यांच्या निवडीचे स्वागत करण्यात येत आहे.

# बाजारात लाऊडस्पीकर वरून सूचना आणि पेट्रोलिंग

## शिक्रापूर, कोरेगाव, तळेगाव आठवडे बाजारात मोबाईल दागिने चोरीवर नियंत्रण आणण्यासाठी शिक्रापूर पोलिसांचे प्रयत्न

शिक्रापूर (दै. संध्या)

■ शिक्रापूर पोलिसांच्या सतर्क पेट्रोलिंगमुळे दोन महिला रंगेहाथ जेरबंद



> आठवडे बाजारात विशेष पेट्रोलिंग, वाहतूक नियोजन आणि जनजागृती मोहीम यापुढेही अधिक प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.बाजारात आपला मोबाईल आणि पर्स सांभाळा.संशयास्पद हालचाल आढळून आल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा. - चंद्रशेखर यादव

शिक्रापूरच्या गजबजलेल्या आठवडे बाजारात बाजारकरूंच्या खिशातील मोबाईल आणि लहान मुलाच्या गळ्यातील सोन्याचा दागिना चोरण्याचा प्रयत्न पोलिसांच्या सतर्कतेमुळे नियंत्रणात आला. विशेष पेट्रोलिंग आणि जनजागृती मोहिमेचा थेट परिणाम म्हणून दोन संशयित महिलांना पोलिसांनी रंगेहाथ ताब्यात घेतले असून त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिक्रापूर,कोरेगाव भीमा आणि तळेगाव ढमढेरे येथील आठवडे बाजारात हजारो नागरिक,शेतकरी आणि व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित राहत असल्याने गर्दीचा फायदा घेऊन मोबाईल चोरी, पाकीटमारी आणि दागिने लंपास करण्याच्या घटना होत असतात.ही बाब लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली तीनही बाजारात मोबाईल आणि पर्स कसे सांभाळावे याबाबत सूचना देण्यासाठी लाऊड स्पीकर लावण्यात आले.विशेष पेट्रोलिंग पथके आणि वाहतूक नियंत्रण पथके तैनात करण्यात आली आहेत.

बाजार परिसरात ध्वनिक्षेपकाद्वारे नागरिकांना सतत सावध राहण्याचे आवाहन केले जात आहे.महिलांनी दागिने आणि पर्सची काळजी घ्यावी, तर पुरुषांनी मोबाईल फोन शर्टच्या वरच्या खिशात ठेवू नये,अशा सूचना सातत्याने दिल्या जात आहेत.

दरम्यान,बाजारात गस्त घालत असताना शिक्रापूर पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव पोलीस उपनिरीक्षक महेश डोंगरे, पोलीस उपनिरीक्षक सोमनाथ कचरे,महिला पोलीस कॉन्स्टेबल पल्लवी वाघोले,पोलीस हवालदार अमोल दांडगे आणि पोलीस कॉन्स्टेबल नारायण वाळके यांच्या पथकाच्या निदर्शनास दोन महिला संशयास्पद हालचाली करताना आल्या.पोलिसांनी त्यांच्यावर लक्ष ठेवले असता त्या एका लहान मुलाच्या गळ्यातील सोन्याचा दागिना चोरण्याच्या प्रयत्नात असल्याचे उघड झाले.

तत्काळ कारवाई करत पोलिसांनी सारिका राजू जाधव (वय ४२, रा. मंतरवाडी,हडपसर,पुणे) आणि साक्षी मेघराज पवार (वय ३०, रा. मंतरवाडी,हडपसर,पुणे) यांना ताब्यात घेतले.

चौकशीदरम्यान त्या शिक्रापूर बाजारात नेमक्या कोणत्या कारणासाठी आल्या याबाबत समाधानकारक उत्तर देऊ शकल्या नाहीत.पुढील तपासात त्या गर्दीचा फायदा घेऊन मोबाईल आणि महिला,लहान मुलांच्या अंगावरील सोन्याचे दागिने चोरण्याच्या उद्देशाने बाजारात आल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी दोन्ही महिलांविरुद्ध शिक्रापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हवालदार हनुमंत गिरमकर करीत आहेत.

ही मोहीम पोलीस अधीक्षक संदीप सिंह के,अपर पोलीस अधीक्षक शुभम कुमार,उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव,सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल देशमुख,सोमनाथ कचरे,पोलीस अंमलदार श्रावण गुपचे,अमोल दांडगे,पंडित मांजरे,संदीप इथापे,अमोल चव्हाण यांनी राबविली आहे.




दैनिक
संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# थोडक्यात पण महत्वाचे



## २३ जून ‘एकल महिला दिवस’ म्हणून साजरा करा

मुंबई (दैनिक संध्या) : संयुक्त राष्ट्रसंघाने घोषित केलेला २३ जून हा ‘आंतरराष्ट्रीय विधवा दिन’ राज्यातील सर्व महापालिका, नगरपालिका, नगरपंचायत आणि ग्रामपंचायतींमध्ये ‘एकल महिला दिवस’ म्हणून साजरा करण्यात यावा, यावेळी गावातील किंवा शहरातील सर्व एकल महिलांना सन्मानाने या कार्यक्रमाला निमंत्रित करण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले आहेत. एकल महिलांच्या सन्मानासाठी ग्रामपंचायतींमध्ये ठराव करण्यात यावा असेही त्या म्हणाल्या. राज्य शासनामार्फत एकल महिला धोरण तयार करण्याची प्रक्रिया सुरू असून या पार्श्वभूमीवर एकल महिलांच्या समस्या, अपेक्षा आणि त्यांच्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांबाबत मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या.

## पावसाच्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन करूया : राठोड

मुंबई (दैनिक संध्या) : हवामान बदलाच्या संकटासमोर संपूर्ण जग उभे असल्यामुळे महाराष्ट्राने जलसंधारणाच्या माध्यमातून एक लोक चळवळ उभी करणे काळाची गरज आहे. शासन, प्रशासन, स्वयंसेवी संस्था आणि सामान्य नागरिकांनी एकत्रितपणे या अभियानात सहभागी होणे आवश्यक आहे. याबरोबरच राज्यातील मृद व जलसंधारणाच्या कामासाठी कुठेही निधीची कमतरता भासू देणार नाही. यावर्षी पावसाच्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन करूया, दुष्काळाला हरवूया आणि जलसमृद्ध महाराष्ट्र घडवूया, असे आवाहन मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी केले आहे. मंत्री संजय राठोड यांनी सांगितले की, जलसंधारण म्हणजे फक्त पाणी अडवणे नाही, जलसंधारण म्हणजे पर्यावरण संवर्धन, जलसंधारण म्हणजे भूजल पुनर्भरण, जलसंधारण म्हणजे शेतकऱ्यांना उत्पन्नाची सुरक्षा आणि जलसंधारण म्हणजे भविष्यातील पिढ्यांसाठी पाण्याची शाश्वत व्यवस्था करणे. महाराष्ट्र शेतीप्रधान राज्य आहे. आपल्या राज्याची अर्थव्यवस्था, ग्रामीण जीवन, उद्योग आणि पर्यावरण हे मोठ्याप्रमाणात पाण्यावर अवलंबून आहे. त्यामुळे जल सुरक्षा ही आज केवळ विकासाची नव्हे तर अस्तित्वाची गरज आहे. एल निनोमुळे यावर्षी मान्सूनच्या पावसावर परिणाम होऊ शकतो. हवामान विभागाने राज्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे.

# इचलकरंजीला शाश्वत पाणीपुरवठ्यासंदर्भात लवकरच निर्णय जाहीर करण्यात येणार

■ मुंबई (दै. संध्या)

इचलकरंजी शहर आणि परिसराच्या दीर्घकालीन तसेच शाश्वत पाणीपुरवठ्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत राज्य शासन सकारात्मक आहे. पाणी साठवणीची क्षमता वाढविण्यासह विविध पर्यायांचा अभ्यास करून लवकरच यासंदर्भातील निर्णय जाहीर करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. इचलकरंजी शहराच्या पाणीपुरवठा प्रश्नासंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी बैठक झाली. बैठकीस खासदार धैर्यशील माने, आमदार राहुल आवाडे, इचलकरंजीचे महापौर, उपमहापौर; तसेच जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत इचलकरंजी शहराच्या वाढत्या पाणी गरजा, कृष्णा नदीवरील उपलब्ध जलस्रोत; तसेच तालुक्यातील गावांच्या पाणीपुरवठ्याबाबत खासदार धैर्यशील माने आणि आमदार राहुल आवाडे यांनी सादरीकरण केले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कृष्णा नदी ही तीन राज्यांना पाणीपुरवठा करणारी महत्त्वाची नदी आहे. कोणत्याही राज्याचे नुकसान न करता संबंधित




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

भागाला आवश्यक पाणी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी इचलकरंजीच्या शाश्वत पाणीपुरवठ्यासाठी आवश्यक पाणी साठवण क्षमता वाढविण्याचे विविध पर्याय तपासण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या. या अभ्यासानंतर तांत्रिक, प्रशासकीय आणि आर्थिक बाबींचा आढावा घेऊन शासनाकडून लवकरच अंतिम निर्णय जाहीर केला जाईल, असे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी महत्त्वाच्या प्रकल्पासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नसल्याचे सांगितले. आवश्यक असल्यास बिनव्याजी दीर्घकालीन कर्ज उपलब्ध करून देण्याचाही विचार केला जाईल. त्याचबरोबर, स्थानिक स्वराज्य संस्थांनी कर वसुली अधिक प्रभावी करावी आणि बांधकाम क्षेत्रातील नियमांचे काटेकोर पालन सुनिश्चित करावे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# कला अकादमी येथे ‘Histories Unbound’ या आंतरराष्ट्रीय समूह कला प्रदर्शनाचे आयोजन

■ मुंबई (दै. संध्या)

पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई येथे ‘Histories Unbound: Dialogues Across Time’ या आंतरराष्ट्रीय समूह कला प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. Arts University Plymouth यांच्या सहकार्याने साकारलेल्या या प्रदर्शनात बार्बरा राचको, जेनी पेटीट, राजुल शाह, सुसान फ्रेझर-ह्यूजेस, सबीने जॅकार्ड आणि डॅनिलो प्रेटो या नामवंत कलाकारांच्या कलाकृती प्रदर्शित करण्यात येणार आहेत. या प्रदर्शनाचा उद्घाटन समारंभ १८ जून रोजी सायं. ६ वाजता होणार आहे.




दोन दिवसीय हे प्रदर्शन इतिहास, स्मृती, ओळख आणि कल्पनाशक्ती यांच्यातील गुंतागुंतीच्या परस्परसंबंधांचा सखोल अभ्यास घडवणारे आहे. इतिहासाला केवळ भूतकाळाचा स्थिर दस्तऐवज म्हणून न पाहता, तो सतत नव्याने अर्थ प्राप्त करणारा आणि विविध दृष्टिकोनांतून उलगडणारा संवाद आहे, या संकल्पनेवर हे प्रदर्शन आधारित आहे. विविध कलामाध्यमांतून साकारलेल्या कलाकृतींमधून प्रेक्षकांना भूतकाळ, वर्तमान आणि भविष्य यांच्यातील संबंधांचा नव्या दृष्टीकोनातून विचार करण्याची संधी मिळेल. ‘भविष्य इतिहासाच्या ओझ्यातून मुक्त होऊ शकते का, की प्रत्येक नवीन सुरुवात ही इतिहासाच्या शाश्वत उपस्थितीतूनच जन्माला येते?’ या मूलभूत प्रश्नाभोवती प्रदर्शनाचा वैचारिक प्रवाह केंद्रित आहे.

हे प्रदर्शन जागतिक स्तरावरील कलात्मक संवादाला चालना देणारे असून, विविध सांस्कृतिक आणि ऐतिहासिक संदर्भांमधील विचारांची देवाणघेवाण घडवून आणण्याचा प्रयत्न करते. कला, इतिहास आणि मानवी अनुभव यांच्या संगमातून निर्माण होणाऱ्या नव्या शक्यतांचा शोध घेण्यासाठी हे प्रदर्शन एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरेल. कला रसिक, अभ्यासक आणि माध्यम प्रतिनिधींनी या प्रदर्शनाला तसेच उद्घाटन समारंभाला उपस्थित राहून या वैश्विक कलासंवादाचा अनुभव घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# जबिलच्या रांजणगाव येथील अत्याधुनिक उत्पादन विस्तार प्रकल्पाचे उद्घाटन




■ पुणे(दै. संध्या)

मुंबई-पुणे बुलेट ट्रेनमुळे दोन्ही शहरांतील प्रवास अवघ्या ४८ मिनिटांत होणार असून मुंबई आणि पुणे हे एकात्मिक आर्थिक क्षेत्र म्हणून विकसित होतील. तसेच जेएनपीटी आणि वाढवण बंदरांना समृद्धी महामार्गालगत स्वतंत्र मालवाहतूक रेल्वे कॉरिडॉरद्वारे जोडून महाराष्ट्राला जागतिक पुरवठा साखळीचे महत्त्वाचे केंद्र बनविण्याचा राज्य शासनाचा संकल्प असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. रांजणगाव औद्योगिक वसाहतीतील जबिल कंपनीच्या अत्याधुनिक उत्पादन विस्तार प्रकल्पाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय रेल्वे, माहिती व प्रसारण तसेच इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव, आमदार दिलीप वळसे पाटील, ज्ञानेश्वर कटके, राज्याचे उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अनबलगन, जॅबिलचे कार्यकारी उपाध्यक्ष (ऑपरेशन्स) अँडी प्रिस्टली, मुख्यमंत्र्यांचे सल्लागार कौस्तुभ धवसे, कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक बी. एन. शुक्ला, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी तसेच एमआयडीसीच्या सह मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र देशातील डेटा सेंटर हब म्हणून उदयास येत असून भारतातील सुमारे ६० टक्के डेटा सेंटर क्षमता राज्यात विकसित होत आहे. त्यामुळे डेटा सेंटर, डीप टेक, इलेक्ट्रॉनिक्स आणि चिप उत्पादनाशी संबंधित संपूर्ण उद्योग परिसंस्था महाराष्ट्रात निर्माण करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असे त्यांनी सांगितले. इलेक्ट्रॉनिक्स निर्यातीमध्ये महाराष्ट्राने अग्रस्थान मिळविल्याचे नमूद करत मुख्यमंत्री म्हणाले की, केंद्र सरकारने राज्याला दिलेल्या इलेक्ट्रॉनिक्स क्लस्टरमुळे उद्योग क्षेत्राला नवी गती मिळणार आहे.

# घरपोच आहारात नव्या पाककृतींचा होणार समावेश – मंत्री आदिती तटकरे

■ मुंबई (दै. संध्या)

अंगणवाडीतील बालकांसह गरोदर महिला, स्तनदा माता तसेच आकांक्षित जिल्ह्यांतील किशोरवयीन मुलींना देण्यात येणाऱ्या घरपोच आहारामध्ये पोषणमूल्यांसोबतच चवीलाही प्राधान्य देत नवीन आणि रुचकर पाककृतींचा समावेश करण्यात आला आहे, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत राज्यातील ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील बालके, गरोदर महिला, स्तनदा माता तसेच आकांक्षित जिल्ह्यांतील किशोरवयीन मुलींना देण्यात येणाऱ्या घरपोच आहारासंदर्भात मंत्रालयात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंत्री तटकरे यांनी स्वतः पोषण आहाराच्या गुणवत्तेची तपासणी केली. बैठकीस महिला व बालविकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव, आयुक्त माधवी सरदेशमुख, आयुक्त डॉ. जगदीश मणियार (दूरदृश्य प्रणालीद्वारे), सहसचिव वी. आर. ठाकूर, अवर सचिव सुनील सरदार, प्रसाद कुलकर्णी, सह आयुक्त वर्षा पवार, उपायुक्त संगीता लोंढे, विजय क्षीरसागर, जामसिंग गिरासे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, केंद्र शासनाच्या निकषानुसार सध्या घरपोच आहार प्रीमिक्स स्वरूपात वितरित केला जातो. मात्र, लाभार्थ्यांकडून मिळालेला प्रतिसाद, क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या सूचना तसेच तज्ज्ञांच्या शिफारशी लक्षात घेऊन या आहारामध्ये महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. सध्याच्या ‘एनर्जी डेन्स मूग डाळ खिचडी प्रीमिक्स’मधील घटकांच्या



मिश्रणात सुधारणा करण्यात आली असून आहाराचा दर्जा अधिक चांगला राखण्यासाठी मसाल्याचे पाकीट स्वतंत्रपणे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याशिवाय ‘मल्टी मिक्स सिरियल्स अँड प्रोटीन्स’ ही पाककृती कायम ठेवण्यात आली आहे. तसेच ‘व्हेज पुलाव’ आणि ‘मल्टीग्रेन पफ’ या दोन नवीन पाककृतींचा समावेश करण्यात आला आहे.

या बदलांमुळे लाभार्थ्यांना आता अधिक पौष्टिक आणि रुचकर पाककृतींचा घरपोच आहार उपलब्ध होणार आहे. सर्व पाककृतींमध्ये केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या प्रमाणात उष्मांक, प्रथिने आणि आवश्यक सूक्ष्म पोषकतत्त्वांचा (मायक्रोन्यूट्रिएंट्स) समावेश करण्यात आला आहे.

राज्यातील कुपोषण कमी करण्यासाठी शासन सातत्याने विविध उपाययोजना राबवत असून मागील तीन वर्षांत कुपोषणाच्या प्रमाणात लक्षणीय घट झाली आहे. नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या पाककृतींमुळे लाभार्थ्यांची आहाराबाबतची स्वीकृती वाढेल आणि कुपोषण कमी करण्याच्या प्रयत्नांना अधिक बळ मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आहाराबाबत माहिती देताना डॉ. अनुपकुमार यादव म्हणाले की, आहारामध्ये बदल करण्यापूर्वी राज्यभर सर्वेक्षण करण्यात आले. तसेच वैद्यकीय अधिकारी, आहारतज्ज्ञ आणि विविध विशेषज्ञ संस्थांची मते जाणून घेण्यात आली. क्षेत्रीय यंत्रणांशी झालेल्या चर्चेदरम्यान या नवीन पाककृतींना लाभार्थ्यांचा सकारात्मक प्रतिसाद मिळेल.

### महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या

# रुग्णांचे स्वागत ‘वेलकम किट’ने करावे – मंत्री आबिटकर

■ मुंबई (दै. संध्या)

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांच्या स्वागतासाठी तयार करण्यात आलेल्या ‘वेलकम किट’ने प्रत्येक रुग्णाचे स्वागत करण्यात यावे तसेच आरोग्यमित्र आणि रुग्णालय प्रशासनाने रुग्णांना आवश्यक ती मदत, मार्गदर्शन आणि सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य मंत्री आबिटकर यांनी केले. महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसंदर्भात राज्यातील अंगीकृत रुग्णालयांची बैठक आरोग्य भवन, मुंबई येथे आरोग्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी राज्यस्तरीय अधिकारी, अंमलबजावणी सहाय्य संस्थाचे प्रतिनिधी, शासकीय व खाजगी अंगीकृत रुग्णालयांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी मंत्री आबिटकर म्हणाले की योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना कोणतीही आर्थिक मागणी न करता पूर्णपणे मोफत व दर्जेदार उपचार मिळणे ही सर्व संबंधित यंत्रणांची सामूहिक जबाबदारी आहे. कोणत्याही परिस्थितीत पात्र रुग्णाला उपचार नाकारले जाणार नाहीत, याची दक्षता घेणे आवश्यक असून योजनेची प्रभावी आणि काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी आवश्यक ती पावले उचलावीत, असे निर्देश त्यांनी दिले. आरोग्यमंत्र्यांनी पुढे सांगितले की, रुग्णांना योजनेंतर्गत सेवा मिळवून




स्पेशल अँकर
सत्य • स्पष्ट • सर्वप्रथम

देण्यासाठी आरोग्यमित्रांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे आरोग्यमित्रांची नियुक्ती, प्रशिक्षण आणि क्षमता विकास यावर विशेष भर देणे गरजेचे आहे. रुग्णांना योजनांचा लाभ सहज आणि वेळेत मिळण्यासाठी आरोग्यमित्रांनी अधिक संवेदनशीलतेने कार्य करावे. राज्यातील पात्र नागरिकांना अधिक परिणामकारक, पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध असून योजनेच्या अंमलबजावणीत सहभागी सर्व घटकांनी समन्वय, संवेदनशीलता आणि जबाबदारीची भूमिका निभावावी, असेही आरोग्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले. बैठकीदरम्यान योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. लाभार्थ्यांना सेवा देताना वापरण्यात येणाऱ्या एचईएमपोर्टल, टीएमएसपोर्टल आणि बीआयएस पोर्टल या विविध डिजिटल प्रणाली व प्रक्रियांबाबत रुग्णालय प्रतिनिधींना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भातील सादरीकरणही करण्यात आले. यावेळी सहभागी रुग्णालयांनी ऑनलाईन आणि ऑफलाईन माध्यमातून विविध सूचना व प्रश्न मांडले. प्री-ऑथरायझेशन मंजुरीसाठी लागणारा कालावधी कमी करणे, नियमित डायलिसिस रुग्णांना प्रत्येक सायकलसाठी ई-केवायसीच्या सक्तीमधून सूट देणे तसेच काही अस्थिरोग (ऑर्थोपेडिक) पॅकेजेसच्या दरांमध्ये सुधारणा करणे यांसारख्या मुद्द्यांवर चर्चा झाली. राज्यस्तरीय अधिकाऱ्यांनी या सर्व प्रश्नांवर सविस्तर स्पष्टीकरण देत आवश्यक कार्यवाहीबाबत माहिती दिली. महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांच्या स्वागतासाठी तयार करण्यात आलेल्या ‘वेलकम किट’चे लोकार्पण या वेळी सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते करण्यात करण्यात आले.

# १ कोटी ९० लाखांचा मुद्देमाल जप्त

■ मुंबई (दै. संध्या)

परराज्यातून होणाऱ्या अवैध मद्य वाहतुकीविरोधात राज्य उत्पादन शुल्क विभागाने धडक मोहीम राबवून मोठी कारवाई केली आहे. भिवंडी येथील मुंबई – नाशिक हायवेवरील वडपे गावच्या कमानीसमोर सापळा रचून तब्बल १ कोटी ९० लाख ३५ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यामध्ये गोवा राज्यात विक्रीसाठी असलेल्या विदेशी मद्याचा साठा आणि एक ६ चाकी कंटेनर ट्रक समाविष्ट आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाला मिळालेल्या माहितीनुसार, गोवा राज्यातून बेकायदेशीररित्या विदेशी मद्याची वाहतूक केली जात होती. त्यानुसार भिवंडी विभाग ठाणे-२ च्या पथकाने वडपे गावाजवळ पाळत ठेवून संशयित अशोक लेलँड ६ चाकी कंटेनर (क्रमांक HR-61 F-1508) थांबवला. वाहनाची झडती घेतली असता, त्यात गोव्यातील नामांकित मद्याच्या तब्बल ७७,७६० सीलबंद बाटल्या (१,६२० बॉक्स) आढळून आल्या. याबाबत हनुमान मोबता राम (वय २८ वर्षे, रा. पिरु का तला, सेदवा, बाडमेर, राजस्थान) याला अटक करण्यात आली आहे. जप्त केलेल्या मुद्देमालमध्ये विदेशी मद्याच्या ७७,७६० सीलबंद बाटल्या त्याची किंमत १ कोटी ६३ लाख २९ हजार ६०० रुपये, अशोक लेलँड कंपनीचे ६ चाकी कंटेनर किंमत २७ लाख रुपये आणि एक मोबाईल त्याची किंमत किंमत ६ हजार रुपये यांचा समावेश आहे. ही यशस्वी कारवाई राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. राजेश देशमुख, ठाणे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, सह आयुक्त (अंमलबजावणी व दक्षता) प्रसाद सुर्वे, कोकण विभागाचे विभागीय उप आयुक्त प्रदीप पवार आणि ठाणे-२ चे अधीक्षक उत्तम शिंदे, उपअधीक्षक अभिजित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# दुर्गम भागातील ७ आरोग्य योद्ध्यांचा राज्यस्तरीय सन्मान

■ मुंबई (दै. संध्या)

नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा व धडगाव या अतिदुर्गम आदिवासी भागांमध्ये प्रतिकूल परिस्थितीत कार्यरत राहून आरोग्य सेवेचा दीप अखंड तेवत ठेवणाऱ्या सात आरोग्य योद्ध्यांचा सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ आणि प्रशस्तीपत्र देऊन विशेष सन्मान करण्यात आला. आरोग्य भवन, मुंबई येथे आयोजित आढावा बैठकीदरम्यान दुर्गम भागातील आरोग्य सेवेची वस्तुस्थिती समोर आणणाऱ्या आणि आपल्या कार्यातून उल्लेखनीय परिणाम साधणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. बैठकीस आमदार चित्रा वाघ, आरोग्य आयुक्त डॉ. सुनिल भोकरे, संचालक डॉ. विजय कंदेवाड, आरोग्य विभागातील इतर वरिष्ठ अधिकारी, उपसंचालक डॉ.कपिल अहेर, नंदुरबार जिल्ह्यातील वरिष्ठ आरोग्य अधिकारी तसेच अक्कलकुवा व धडगाव येथील आरोग्य अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. या सन्मानाचा उद्देश दुर्गम भागात कार्यरत आरोग्य कर्मचाऱ्यांचे मनोबल उंचावणे, त्यांच्या कार्याला सार्वजनिक मान्यता मिळवून देणे आणि इतर कर्मचाऱ्यांनाही प्रेरणा देणे हा आहे. डॉ. गुणवंत कांबळे यांनी २०१४ पासून दुर्गम व आदिवासी भागात सेवा बजावताना माता व बाल आरोग्य क्षेत्रात विशेष कार्य केले आहे. प्रसूती व स्त्रीरोग विषयातील पदव्युत्तर पदविका प्राप्त केल्यानंतर त्यांनी नंदुरबार जिल्हा महिला व बालरुग्णालयात तसेच ग्रामीण रुग्णालय मोलगी येथे उच्च जोखमीच्या गर्भवती मातांना तज्ज्ञ सेवा उपलब्ध करून दिल्या. त्यांच्या नेतृत्वाखाली ग्रामीण रुग्णालय मोलगी येथे उच्च जोखमीच्या प्रसूतींची संख्या ७४० वरून ९८० पर्यंत



■ सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते गौरव

वाढली असून संस्थात्मक प्रसूतीचे प्रमाण सुमारे ३० टक्क्यांनी वाढले आहे. परिणामी घरगुती प्रसूती कमी होऊन माता मृत्यू कमी करण्यास मोठी मदत झाली आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र मांडवा येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. राहुल नायका यांनी गेल्या पाच वर्षांत माता मृत्यूदर कमी करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न केले आहेत. आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी आणि ग्रामस्थांच्या सहभागातून संस्थात्मक प्रसूतीचे प्रमाण वाढविण्यात त्यांना यश आले असून मागील दोन वर्षांत त्यांच्या कार्यक्षेत्रात एकही माता मृत्यू होऊ दिलेला नाही. दुर्गम भागातील नागरिकांचा आरोग्य व्यवस्थेवरील विश्वास दृढ करण्यात त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र रोषमाळ खुर्द येथील डॉ. हिमांशू चव्हाण यांनी कुपोषण कमी करणे, सिकलसेलग्रस्त रुग्णांचे समुपदेशन व उपचार, उच्च जोखमीच्या गर्भवती मातांचे व्यवस्थापन तसेच असंसर्गजन्य आजारांवरील उपचार यामध्ये विशेष कामगिरी केली आहे. मागील दोन वर्षांत ४० हून अधिक सर्पदंश आणि १५ हून अधिक विंचूदंश रुग्णांचे प्राण वाचविण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### खेड तालुक्यातील दोन आरोग्य उपकेंद्र राज्यात अव्वल

चाकण (दैनिक संध्या) : केंद्र सरकारच्या राष्ट्रीय आरोग्य प्रणाली संसाधन केंद्रामार्फत घेण्यात आलेल्या सर्वेक्षणात पुणे जिल्हा परिषदेची आरोग्य उपकेंद्रे गुणवत्ता व दर्जाच्या निकषांवर महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर आली असून, खेड तालुक्यातील दोन उपकेंद्रांचा यामध्ये समावेश झाला आहे. खेड तालुक्यातील टाकळकरवाडी प्राथमिक आरोग्य उपकेंद्राला ९४.८ टक्के, तर रिहे प्राथमिक आरोग्य उपकेंद्राला ९३.२९ टक्के गुण प्राप्त झाले आहेत. या गुणवत्तेच्या आधारे ही दोन्ही उपकेंद्रे महाराष्ट्रातील सर्वोत्तम उपकेंद्रांमध्ये स्थान मिळविण्यात यशस्वी ठरली. पुणे जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने केलेल्या प्रामाणिक प्रयत्नांचे हे फलित असल्याचे मानले जात आहे. या यशामध्ये योगदान देणाऱ्या सर्व अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांचे जिल्हा परिषदेच्या वतीने कौतुक करण्यात आले. आयुष्मान आरोग्य मंदिर राजगुरुनगर अंतर्गत असलेल्या टाकळकरवाडी उपकेंद्राचे राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय स्तरावरील परीक्षकांनी मूल्यांकन केले होते. या उपकेंद्रातील समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. प्रतीक्षा येडले, आरोग्य सेविका अर्चना मांजरे, आरोग्य सेवक प्रतीक गवारी, रोहन कोळपकर, आरोग्य सहाय्यक महेश दहिवळ, आरोग्य सहाय्यीका माधुरी थिगळे, आशा स्वयंसेविका व कर्मचाऱ्यांनी मूल्यांकन प्रक्रियेसाठी परिश्रम घेतले. मूल्यांकनासाठी ग्रामपंचायत टाकळकरवाडीचे सरपंच व सर्व सदस्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाकडून मूल्यांकनाचा अहवाल प्राप्त झाला. त्यामध्ये आयुष्मान आरोग्य मंदिर, टाकळकरवाडी यांस ९४.८ टक्के गुण प्राप्त झाले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रामचंद्र हंकारे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विलास माने यांचे या मूल्यांकनासाठी विशेष सहकार्य लाभले. वैद्यकीय अधिकारी डॉ. इंदिरा पारखे यांनी मार्गदर्शन केले. टाकळकरवाडी आरोग्य मंदिर हे आता तालुका व जिल्ह्यातील अन्य आरोग्य संस्थांसाठी आदर्शवत ठरले आहे.



### ‘महाराष्ट्राचे अनमोल रत्न’ पुरस्काराने अभिमन्यू नागवडे यांचा गौरव

■ बायोगॅस क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची राज्यस्तरावर दखल

कोरेगावमूळ (दैनिक संध्या) : बायोगॅस क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे युवा उद्योजक तथा शेतकरी पुत्र अभिमन्यू नागवडे यांना एबीपी माझा वृत्तवाहिनीच्या वतीने प्रदान करण्यात येणारा प्रतिष्ठेचा ‘महाराष्ट्राचे अनमोल रत्न’ पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाराष्ट्राचे उद्योगमंत्री उदय सामंत तसेच अभिनेत्री पूजा सावंत यांच्या हस्ते हा सन्मान देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. पुरस्कार स्वीकारल्यानंतर भावना व्यक्त करताना अभिमन्यू नागवडे म्हणाले, “‘महाराष्ट्राचे अनमोल रत्न’ हा सन्मान माझ्यासाठी केवळ पुरस्कार नसून एका शेतकरी पुत्राच्या संघर्षाचा, जिद्दीचा आणि स्वप्नांचा गौरव आहे. सामान्य शेतकरी कुटुंबातून प्रवास सुरू करताना मोठी संपत्ती नव्हती, मात्र शेतकरी ऊर्जा आत्मनिर्भर व्हावा, त्याचा खर्च कमी व्हावा आणि बायोगॅसच्या माध्यमातून त्याच्या जीवनात सकारात्मक बदल घडावा, हे मोठे स्वप्न मनात होते. आज त्या स्वप्नाच्या प्रवासाला मिळालेली ही प्रेमाची आणि विश्वासाची पावती आहे.” ते पुढे म्हणाले, “जीवनात किती पैसा कमावला यापेक्षा आपल्या कार्यामुळे किती शेतकऱ्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवता आला, किती चेहरे हसले आणि समाजासाठी काय उभे करता आले, यालाच खऱ्या यशाचे मोल असते.” या पुरस्काराचे श्रेय त्यांनी आई-वडिलांचे संस्कार, कुटुंबीय, मित्रपरिवार, सहकारी आणि कायम पाठिशी उभ्या राहिलेल्या शेतकरी बांधवांना दिले. तसेच एका युवा शेतकरी पुत्राच्या कार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान केल्याबद्दल त्यांनी एबीपी माझाचे आभार मानले. “हा सन्मान माझी जबाबदारी आणखी वाढवणारा आहे. यापुढेही अधिक जोमाने, प्रामाणिकपणे आणि समर्पणाने शेतकरी, पर्यावरण आणि ऊर्जा आत्मनिर्भर भारतासाठी कार्य करत राहीन,” असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

# जलतरण तलावात पोहताना १३ वर्षाच्या मुलाचा मृत्यू

लोणी काळभोर (दै. संध्या)



जलतरण तलावात पोहण्यासाठी गेलेल्या एका १३वर्षांच्या निष्पाप बालकाचा पाण्याचा अंदाज न आल्याने बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना कोरेगाव मूळ (ता. हवेली) येथील 'स्वामी समर्थ स्विमिंग टँक'मध्ये घडली . बुधवारी (ता.10) दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास हि घटना घडली. यश महेश गायकवाड (वय १३ वर्षे रा. हिंगणगाव, ता. हवेली, जि. पुणे) असे या मृत बालकाचे नाव आहे. याबाबत मयत मुलाचे वडील महेश तुकाराम गायकवाड, (वय-४१ व्यवसाय खाजगी नोकरी, रा. हिंगणगाव ता. हवेली) यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात खबर दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हिंगणगाव येथील महेश गायकवाड हे बुधवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास त्यांचा मुलगा यश याला पोहता यावे आणि त्याचा सराव व्हावा म्हणून कोरेगाव मूळ येथील स्वामी समर्थ स्विमिंग टँकवर स्वतः सोबत घेऊन आले होते.दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास महेश गायकवाड हे आपला मुलगा कसा पोहतोय, हे कौतुकाने पाहण्यासाठी स्विमिंग पूलच्या कडेला गेले. त्यावेळी यश पाण्यात आनंदात पोहत होता. त्यानंतर साधारण .१०मिनिटांनी वडील पुन्हा यशला पाहण्यासाठी गेले असता, त्यांना यश पाण्यात कुठेच दिसला नाही.आपला मुलगा पाण्यात दिसत नसल्याने घाबरलेल्या वडिलांनी तातडीने तिथल्या स्विमिंग कोचला "माझा मुलगा कुठे आहे? तो स्विमींग टँकमध्ये दिसत नाही," अशी विचारणा केली. त्यावर तिथल्या कोचने सांगितले कि "तो बाथरूममध्ये कपडे चेंज करण्यासाठी गेला असेल," वडिलांनी तात्काळ बाथरूम, चेंजिंग रूम आणि स्विमिंग पूलचा आजूबाजूचा संपूर्ण परिसर पिंजून काढला, मात्र यश कुठेही दिसून आला नाही. वडिलांनी पुन्हा धावत जाऊन कोचला मुलगा सापडत नसल्याचे सांगितले. अखेर तिथेच पोहणाऱ्या एका दुसऱ्या मुलाने संशय आल्याने पाण्याच्या तळाशी जाऊन पाहिले, तेव्हा यश हा पाण्याच्या तळाशी निपचित पडलेला दिसला. त्या मुलाने यशला तातडीने पाण्याच्या बाहेर काढले. त्यानंतर तिथे हजर असलेले कोच, स्विमिंग पूलचे मालक आणि स्वतः वडिलांनी यशच्या पोटातील पाणी बाहेर काढण्यासाठी प्रथमोपचार केले.

दरम्यान, त्यानंतर एका चारचाकी गाडीतून त्याला तातडीने उरुळी कांचन येथील एका खासगी रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, तिथल्या डॉक्टरांनी यशला तपासून 'उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला असल्याचे' घोषित केले. मृत बालकाचे वडील महेश गायकवाड यांनी दिलेल्या खबरीवरून उरुळी कांचन पोलीस ठाण्यात 'अकस्मात मयत' अशी नोंद करण्यात आली आहे.

### उरुळी कांचन पोलिसांच्या कारवाईकडे सर्वांचे लक्ष

उन्हाळ्याच्या आणि सुट्ट्यांच्या दिवसांत अशा स्विमिंग पूलवर मुलांची मोठी गर्दी असते. मात्र, स्वामी समर्थ स्विमिंग पूलवर एवढी मोठी दुर्घटना घडत असताना तिथले लाइफगार्ड आणि कोच काय करत होते? त्यांनी वेळेवर लक्ष का दिले नाही? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. उरुळी कांचन पोलीस या प्रकरणी स्विमिंग पूल प्रशासनाच्या हलगर्जीपणाची कडक कारवाई करणार का असा प्रश्न उपस्थित होत आहे.उरुळी कांचन पोलिसांची प्रतिमा विषारी दारुमुळे मलीन झाली असुन जलतरण तलावाच्या प्रकरणाची माहिती घेण्यासाठी फोन केला असता. ज्यांच्या कडे तपास आहे तेच अधिकारी मी या विषयी माहिती देऊ शकत नाही आमच्या वरिष्ठांना विचारा असे म्हणून माहिती देण्यासाठी टाळाटाळ करत आहेत . तर वरिष्ठ फोन उचलत नाही . अकस्मात मयत' अशी नोंद करुन हे प्रकरण धडपणार तर नाही ना ? की खरोखरच जलतरण तलावाच्या प्रकरणी जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कडक कारवाई करणार का याकडे परिसरातील अनेक गावांचे लक्ष लागले आहे.

### सुसमध्ये मूलनायक वेदी शिलान्यास, आचार्य-मुनिश्रींच्या सान्निध्यात जैन समाजाला उपस्थितीचे आवाहन

पुणे (दै. संध्या)

पुण्याजवळील सुस येथील श्री १००८ शांतिनाथ रत्नत्रय दिगंबर जैन मंदिरात येत्या रविवारी २१ जून २०२६ रोजी मूलनायक वेदी शिलान्यास सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ७ वाजल्यापासून विविध धार्मिक कार्यक्रमांना सुरुवात होणार असून, जैन समाजातील भाविकांसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होण्याची अपेक्षा आहे. या सोहळ्यात मूलनायक वेदी शिलान्यासासह कल्याण मंडप प्रतिमा पुण्यार्जक चयन, मुख्य वेदी व कल्याण मंडप वेदी पुण्यार्जक चयन, कल्याण मंडप चाबी स्थापना तसेच इतर धार्मिक विधी पार पडणार आहेत.

या कार्यक्रमाला आचार्य श्री १०८ शांतिसागरजी महाराज, आचार्य श्री १०८ विद्यासागरजी महाराज आणि आचार्य श्री १०८ समयसागरजी महाराज यांच्या आशीर्वादाने आयोजन करण्यात आले आहे. तसेच पूज्य मुनिश्री १०८ अजितसागरजी महाराज, मुनिश्री १०८ नीरागसागरजी महाराज आणि ऐलक श्री १०५ विवेकानंदसागरजी महाराज यांच्या उपस्थितीत कार्यक्रम होणार आहे. याशिवाय नांदणी येथील स्वस्तिश्री जिनसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी संस्थान मठ, कोल्हापूर येथील स्वस्तिश्री लक्ष्मीसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी संस्थान मठ आणि प्रतिष्ठाचार्य श्री संदेशजी उपाध्ये यांच्या मार्गदर्शनाखाली धार्मिक विधी पार पडतील.

## भारती विद्यापीठचे कुलपती प्रो. डॉ. शिवाजीराव कदम यांचा अमृतमहोत्सव कार्यक्रम संपन्न

पुणे (दै. संध्या)



काल दिनांक 14 जून 2026 रोजी सायंकाळी साडेपाच वाजता भारती विद्यापीठ पुणे, धनकवडी कॅम्पस परिसरामध्ये भव्य दिव्य असा माननीय प्रोफेसर डॉक्टर शिवाजीराव कदम, कुलपती भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय पुणे यांच्या अमृत महोत्सवी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता या समारंभास प्रमुख पाहुणे महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते व महाराष्ट्र राज्य सरकारमधील वरिष्ठ मंत्री माननीय नामदार राधाकृष्ण विखे पाटील साहेब, जलसंपदा मंत्री आणि माननीय केंद्रीय मंत्री नामदार मुरलीधरजी मोहोळ , सहकार व विमान वाहतूक राज्यमंत्री, भारत सरकार, समारंभाचे अध्यक्ष भारती विद्यापीठाचे कार्यवाह, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचे उपकुलगुरु, माजी मंत्री, आमदार डॉक्टर विश्वजीत पतंगराव कदम, कार्याध्यक्ष मा आनंदराव पाटील, मा त्यागमूर्ती विजयमाला पतंगराव कदम अध्यक्षा शालेय शिक्षण विभाग, भारती विद्यापीठ, मा. रजनीताई शिवाजीराव कदम , मा. कुलगुरू डॉ विवेक सावजी , भारती हॉस्पिटलच्या कार्यकारी संचालिका डॉक्टर अस्मिता जगताप, कुलसचिव, भारती विद्यापीठाचे सहकार्यवाह आणि यांचा अमृत महोत्सवानिमीत सत्कार समारंभ ज्यांच्यासाठी आयोजित केला होता आणि ज्यांच्या जीवनावर आधारित लेख व आठवणींचा विशेष अंक प्रसिद्ध करण्यात आला ते नायक माननीय प्रोफेसर डॉक्टर शिवाजीराव कदम सर इतर निमंत्रित माननीय विविध महाविद्यालयाचे प्राचार्य पुण्यातील व महाराष्ट्रातील नामवंत शिक्षणतज्ज्ञ, यांच्या उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला माननीय डॉक्टर शिवाजीराव कदम यांच्या जीवनावर आधारित एका विशेष अंकांचे लेखक व संकलक म्हणून काम करण्याची संधी मला मिळाली आणि या अंक प्रकाशनाच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होता आले याचा मला मनस्वी आनंद आपणास माहितीसाठी प्रा. सीए.डॉ. महादेव हरुबाई साहेबराव जाधव (प्रा. सीए.डॉ.एम. एच्.एस. जाधव)

# स्मार्ट मीटरविरोधातील पहिला इशारा दुर्लक्षित

## आज ग्राहकांना परिणाम भोगावे लागत असल्याचा दावा

कोरेगामुळ (दै. संध्या)



स्मार्ट मीटर व प्रीपेड मीटर प्रणालीच्या विरोधात महाराष्ट्रातच नव्हे तर देशात सर्वप्रथम रस्त्यावर उतरुन आवाज उठवणारी महाऊर्जा इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर संघटना, महाराष्ट्र राज्य असल्याचा दावा संघटनेचे राज्य उपाध्यक्ष मोहन नागोराव कदम यांनी केला आहे. पुण्यातील रास्ता पेठ गेट समोर आयोजित करण्यात आलेल्या मोर्चात संघटनेने स्मार्ट मीटर धोरणाविरोधात तीव्र भूमिका घेतली होती. मात्र त्या वेळी इतर संघटना, ग्राहक तसेच जनसामान्यांनी या विषयाकडे गांभीर्याने पाहिले नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. मोहन कदम म्हणाले की, 'त्या वेळी सर्वांनी संघटनेला पाठिंबा दिला असता तर आज वाढीव वीज बिल, प्रीपेड मीटरमुळे निर्माण होणाऱ्या अडचणी आणि ग्राहकांवर होणारा आर्थिक भार याबाबत अधिक प्रभावी लढा उभा राहिला असता'. पत्रकार भवन ते रास्ता पेठ गेटपर्यंत आंदोलन, महाऊर्जा इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकार भवन तसेच पुणे रास्ता पेठ गेट येथे आंदोलन करुन स्मार्ट मीटर योजनेचे संभाव्य दुष्परिणाम जनतेसमोर मांडले होते. 'आदानीच्या घशात घातलेला स्मार्ट मीटरचा अजगर' या प्रतीकात्मक बॅनरद्वारे संघटनेने याविरोधात जनजागृती केली होती. वाढीव वीज बिलांबाबत प्रश्नचिन्ह, संघटनेच्या मते, स्मार्ट मीटर योजनेमुळे ग्राहकांना वाढीव वीज बिलांचा सामना करावा लागत असून याबाबत राज्यभरात नाराजी वाढत आहे. आज विविध राजकीय पक्ष आणि संघटना देखील स्मार्ट मीटर विरोधात आक्रमक भूमिका घेताना दिसत आहेत. टेंडर प्रक्रियेवरही सवाल, मोहन कदम यांनी स्मार्ट मीटरसाठी करण्यात आलेल्या टेंडर प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मीटर बसवले किंवा नाही बसवले तरी संबंधित टेंडरची आर्थिक प्रक्रिया पूर्ण झाल्याचा आरोप त्यांनी केला. या संपूर्ण प्रक्रियेची स्वतंत्र चौकशी व्हावी, अशी मागणीही त्यांनी केली. अन्यायाविरोधातील लढा सुरूच राहणार :- 'सर्वसामान्य ग्राहकांच्या हितासाठी आणि वीज ग्राहकांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात महाऊर्जा इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर संघटना महाराष्ट्र राज्य कायम संघर्ष करत राहील', असे स्पष्ट मत राज्य उपाध्यक्ष मोहन नागोराव कदम यांनी व्यक्त केले.



### हाडशी गावात भिषण पाणी टंचाई; गावात छोटा डॅम असूनही पाण्यासाठी दाही दिशा

कोळवण (दै. संध्या)

हाडशी गावात मागील एक महिन्यापासून भिषण पाणी टंचाई आहे. विशेष म्हणजे गावातच पाटबंधारे विभागाचा एक तलाव असून, त्यातील पाणी सोडण्याचे योग्य नियोजन नसल्याचे दिसून आले असून, तलावातील उपलब्ध पाणीसाठा हा मृत पाणीसाठ्याचे खाली गेला असून तलाव कोरडा ठणठणीत पडला आहे. पाटबंधारे विभागाचे वतीने जे पाण्याचे आवर्तन वळकी नदीत सोडले जाते त्याचे नियोजन योग्य पद्धतीने केले गेले नसून पाटबंधारे विभागाने या तलावाचे पाणी योग्य नियोजन न करता सोडले. त्यामुळे आता गावातील सुमारे १६० कुटुंबातील ९०० लोकांना पाण्यासाठी इतरत्र भटकंती करावी लागत आहे. असे आरोप हाडशी ग्रामस्थ यांनी केले आहे. गावातील पिण्याच्या पाण्यासाठी असणारी विहीर पाण्याअभावी आटली आहे. याबाबत पाटबंधारे विभागाचे अभियंता किशोर चव्हाण यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी थोड्या वेळाने फोन करतो, असा मेसेज पाठवला पाटारी कोंढरेंनी फोन उचलला नाही.

# एल निनोचा प्रभाव; पावसावर व शेतीवर परिणाम?

### सहायक कृषी अधिकारी नंदू जाधव यांचा इशारा

कवठे येमाई (दै. संध्या)



सध्याच्या हवामानातील बदलत्या परिस्थितीमुळे ‘एल निनो’ (El Niño) या नैसर्गिक हवामान घटनेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. प्रशांत महासागरातील समुद्राच्या पाण्याचे तापमान वाढल्याने निर्माण होणाऱ्या या घटनेचा परिणाम जगभरातील हवामानावर होत असून भारतातील मान्सूनवर,पावसावर व शेतीवरही मोठा परिणाम होणार असल्याची माहिती कृषी विभागातील कवठे-केंदूर बीट विभागाचे सहायक कृषी अधिकारी नंदू जाधव यांनी स्पष्ट इशारा दिला आहे. कृषी क्षेत्राबरोबरच इतर ही बाबींवर त्याचा प्रभाव पडू शकतो असेही जाधव म्हणाले. आज बुधवार दि.१७ रोजी शिरूर तालुक्यातील केंदूर येथे झालेल्या बदलते हवामान,शेतकरी मार्गदर्शन,एल निनोचा प्रभाव,गाव शिवार फेरी कार्यक्रमासाठी,सरपंच सुदाम पऱ्हाड,शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य राम विठ्ठल साकोरे, प्रा.शरद अडूरकर,दशरथ सुक्रे,सूर्यकांत थिटे व अनेक शेतकरी बांधव आवर्जून उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना कृषी सहायक अधिकारी जाधव म्हणाले कि,तज्ज्ञांच्या माहितीनुसार, एल निनो मुळे पावसाचे प्रमाण कमी होण्याची, दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्याची तसेच तापमानात वाढ होण्याची शक्यता असते. याचा थेट परिणाम शेती उत्पादनावर होऊ शकतो. काही भागांमध्ये पाण्याची तीव्र ते अतितीव्र टंचाईही जाणवू शकते.कृषी विभागाने शेतकऱ्यांना पाण्याचे योग्य नियोजन करण्याचे आवाहन केले आहे. ठिबक व तुषार सिंचनाचा वापर, कमी पाण्यात येणाऱ्या पिकांची निवड आणि हवामान अंदाजानुसार शेती व्यवस्थापन करण्याचा सल्ला देखील कृषी विभागाकडून देण्यात आला आहे."हवामान बदल जाणून घ्या, शेतीचे योग्य नियोजन करा" असा संदेश कृषी विभागाच्या वतीने नंदू जाधव यांनी दिला आहे.

एल निनो काळातील कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी २५ कृतीसूत्रे,पाऊस कमी असो वा अनियमित, योग्य नियोजनाने शेती टिकवूया,पावसाची खात्री होण्यापूर्वीच घाईने पेरणी करू नका.संपूर्ण क्षेत्राची एकाच दिवशी पेरणी टाळा.राखीव बियाण्याचा साठा ठेवा.कमी कालावधीच्या वाणांना प्राधान्य द्या.दुष्काळ सहिष्णू पिकांची निवड करा.ज्वारी, बाजरी, तूर, मूग, उडीद, तीळ यांसारख्या पिकांना प्राधान्य द्या. मोनो क्रॉप पेक्षा मिश्र पीक पद्धती अवलंबा. सोयाबीन, ज्वारी + तूर, कापूस + मूग यांसारखी आंतरपिके घ्या.पिकांची विविधता वाढवा. उन्हाळी खोल नांगरणी करा. कंटूर बंडिंग व चराईबंदी करा. कंपार्टमेंट बंडिंग द्वारे पाणी अडवा.

गादीवाफा (BBF) पद्धतीचा अवलंब करा.पेरणीनंतर मल्चिंग (आच्छादन) करा.पीक अवशेष जाळू नका.शेततळे व जलसाठा निर्मितीवर भर द्या.उपलब्ध पाणी संरक्षित सिंचनासाठी राखून ठेवा. ठिबक व तुषार सिंचन वापरा. खुरपणी व कोळपणी वेळेवर करून ओलावा जपा.हवामान अंदाजाचा नियमित अभ्यास करा. रोग व किडीचे सतत निरीक्षण करा.पावसात खंड पडल्यास पर्यायी पिकांची तयारी ठेवा. शेताच्या बांधावर वृक्ष लागवड करा.शेतीसोबत पशुपालन, दुग्धव्यवसाय किंवा शेळीपालन जोडा. “पाणी वाचवा – माती जपा – पीक विविधता वाढवा” हे सूत्र अंगीकारा.लक्षात ठेवा “एकच पीक, एकच पेरणी आणि पावसावर पूर्ण अवलंबित्व” हे टाळा.

मिश्र पीक पद्धती,कमी कालावधीची वाण,पाणी साठवण,हवामानानुसार नियोजन,आजचे नियोजन उद्याचे उत्पादन व उत्पन्न सुरक्षित करेल असा विश्वास कृषी सहायक अधिकारी नंदू जाधव यांनी व्यक्त केला आहे.

